दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २०७ I सोमवार ११ मे २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## आत्म्याला ओळखता आले पाहिजे



'सहजयोग'
भाग ४९

कोणत्याही मानवालासुद्धा काहीही अर्थ नाही आहे जोपर्यंत त्याचे परमात्म्याशी तादात्म्य झालेले नाही. हे झालंच पाहिजे.जर हे झालं नाही तर ह्या मनुष्याच्या आयुष्याला काहीही अर्थ नाही. तो निरर्थक आहे. तो जन्माला येतो काय आणि मरतो काय, काहीही फरक नाही. जर मनुष्याला देवपण घ्यायचं नसलं आणि त्याला जर आत्म्याशी संबंध जोडायचा नसला तर तो कामातून गेला. तुम्ही आत्म्याला ओळखलं पाहिजे आणि आत्म्यामध्ये लीन झाले पाहिजे. पण ते व्हायचं कसं? ही कुंडलिनी शक्ती तुमच्यात जागृत होते तेव्हा. मग ही कशी जागृत होते ? जसं एखाद्या बी ला तुम्ही मातेच्या उदरात घातलं म्हणजे ते कसं आपोआप अंकुरतं तसं आपोआप सहजच ही कुंडलिनी तुमच्यामध्ये जागृत होते, पण त्याला जागृत करणारा कुणीतरी अधिकारी पुरुष लागतो. अधिकार परमेश्वरापासून, परमेश्वराच्या प्रेमापासून आलेला पाहिजे. पोटभरू लोकांना हे कार्य जमणार नाही.जेव्हा माणसं आपल्याला असं समजतात की आम्ही म्हणजे काहीतरी मोठे आहोत. आम्ही मोठे अमुक आहोत, तमुक आहोत तर ते नुसते मानव स्थितीत आहेत फक्त. त्यांचा काहीही उपयोग परमेश्वराला होत नाही. जेव्हा तुमचा संबंध आत्म्याशी होतो तेव्हा तुमच्यातून ही ब्रह्मशक्ती वाहून पसरलेली आहे.
०३ फेब्रुवारी १९८२ राहुरी

अधिक माहितीसाठी
www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..



### रुपाली चाकणकरांची चार तास एसआयटी चौकशी

नाशिक : राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या तथा राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात तब्बल चार तास एसआयटी चौकशी झाली. एसआयटीच्या प्रमुख तेजस्वी सातपुते यांनी रुपाली चाकणकर यांची चौकशी केल्याची माहिती आहे. अशोक खरात प्रकरणात अनेक व्हिडीओ समोर आले आहेत. अनेक महिला आणि मुली अशोक खरातच्या विरोधात समोर आले आहेत. अशोक खरात कशाप्रकारे महिला आणि मुलींचं लैंगिक शोषण करायचा ते आता स्पष्ट झालं आहे. या प्रकरणात राज्य सरकारने तयार केलेल्या एसआयटीकडून चौफेर तपास केला जात आहे. अशोक खरातला अटक केल्यानंतर रुपाली चाकणकर यांच्यादेखील चौकशीची म ागणी केली जात होती. अखेर या प्रकरणातील आरोपांच्या पार्श्वभूमीवर रुपाली चाकणकर यांची तब्बल चार तास चौकशी झाली. या चौकशीनंतर रुपाली चाकणकर यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली.

# जुलैपासून राज्यात 'लँड टायटलिंग ॲक्ट'

- मालमत्तांना मिळणार कायदेशीर संरक्षण
- जगात कुठेही बसून करता येणार व्यवहार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे : राज्यात येत्या जुलै महिन्यापासून 'लँड टायटलिंग ॲक्ट' लागू करण्यात येणार असून, या कायद्यामुळे राज्यातील १४ कोटी नागरिकांच्या मालम त्तांना कायदेशीर संरक्षण मिळणार आहे. तसेच जगात कुठेही बसून मालमत्तेची माहिती पाहणे आणि व्यवहार करणे शक्य होणार असल्याची माहिती राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रविवारी पुण्यात दिली.**

### धमक असेल तर संबंधित मंत्र्यांची नावे जाहीर करा



**काँग्रेस नेते नाना पटोले यांनी 'भोंदूबाबा खरात' प्रकरणात चार मंत्र्यांचा संबंध असल्याचा आरोप केला आहे. याबाबत बोलताना बावनकुळे यांनी धमक असेल तर संबंधित मंत्र्यांची नावे जाहीर करावीत, असे आव्हान दिले. तसेच नसरापूर येथील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपीला कठोर शिक्षा व्हावी यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचेही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.**

भारती विद्यापीठाच्या ६२व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमानंतर पत्रकारांशी संवाद साधताना बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार महसूल विभागाकडून या कायद्याला अंतिम स्वरूप देण्याचे काम सुरू आहे. महाराष्ट्र हा कायदा लागू करणारे देशातील पहिले राज्य ठरणार असल्याचा दावा त्यांनी केला.

या कायद्यामुळे राज्यातील प्रत्येक म ालमत्तेची अधिकृत आणि निश्चित डिजिटल नोंद तयार होणार आहे. त्यामुळे जमीन मालकीचे वाद, दुबार विक्री, बनावट कागदपत्रे आणि वारसाहक्काचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर कमी होतील. मालमत्तेचा मालक कोण, त्याचे हक्क काय आणि त्या मालम त्तेवर कोणते व्यवहार झाले आहेत, याची स्पष्ट व कायदेशीर माहिती उपलब्ध राहणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

राज्यातील जमीन अभिलेख आणि मालमत्ता नोंदी पूर्णपणे डिजिटल स्वरूपात आणण्याचा सरकारचा विचार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रणालीमुळे मालमत्ता व्यवहारातील पारदर्शकता वाढून बँकिंग, उद्योग आणि गुंतवणुकीला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## तमिळनाडूत 'विजय सरकार'!

### विजय थलपती यांचा शपथविधी संपन्न: राहुल गांधी यांची उपस्थिती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**चेन्नई :** तमिळनाडूच्या राजकारणात रविवारी ऐतिहासिक सोहळा पार पडला. 'थलपती विजय' म्हणून ओळखले जाणारे सी. जोसेफ विजय यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. यावेळी त्यांच्या आई-वडिलांच्या डोळ्यांत अश्रू तरळत होते. चेन्नईतील जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये झालेल्या या भव्य शपथविधी सोहळ्याला राजकीय नेते, चित्रपटसृष्टीतील दिग्गज आणि हजारो समर्थक, फॅन्स उपस्थित होते. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनीही या सोहळ्याला उपस्थिती लावून सर्वांचे लक्ष वेधले. दरम्यान, अभिनेत्री त्रिशा कृष्णन देखील शपथविधी सोहळ्याच्या ठिकाणी उपस्थित होत्या.




तमिळ चित्रपटसृष्टीचे सुपरस्टार जोसेफ थलापती विजय यांनी २०२६च्या तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत प्रचंड विजय मिळवला आहे. त्यांनी आपल्या 'तमिळगा वेत्री कळघम' (टीव्हीके) या पक्षाद्वारे राज्यभरात निवडणूक लढवली आणि त्यांना प्रचंड जनसमर्थन मिळाले. ते राज्याचे नवे मुख्यमंत्री बनले आहेत. दरम्यान, थलपती विजय यांच्यासोबत आज त्यांच्या मंत्रिमंडळातील ९ आमदारांनीही मंत्रीपदाची शपथ घेतली आहे. यामध्ये प्रामुख्याने थिरू एन. आनंद, सीटीआर निर्मल कुमार, अरुण राज आणि आधव अर्जुना यांचा समावेश आहे. याशिवाय राजमोहन, व्यंकटरमणन आणि सेनगोट्टैयान यांनी देखील मंत्रिपदाची तथा गोपनियतेची शपथ घेतली आहे.



## विहीर खोदताना मातीचा ढिगारा खचला
# दोन तरुण मुलांसह पित्याचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरमथील सिल्लोड तालुक्यातील धानोरा गावात विहिरीचे काम सुरू असताना अचानक मातीचा ढिगारा खचल्यानं, विहिरीत पडलेल्या दोन तरुण मुलांसह वडिलांचा जागीच मृत्यू झाला. शनिवारी रोजी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास ही काळजाचा ठोका चुकवणारी दुर्घटना घडली. बाजीराव सर्जेराव काकडे (वय ५५), आजिनाथ बाजीराव काकडे (वय २५) आणि शाम बाजीराव काकडे (वय २२) अशी मृतांची नावे आहेत. या घटनेने काकडे कुटुंब उद्ध्वस्त झाले असून संपूर्ण धानोरा गावावर शोककळा पसरली.

काकडे यांच्या शेतात नवीन विहिरीचं काम सुरू होतं. रात्रीच्या वेळी विहिरीत पाणी साचलं होतं. हे पाणी उपसण्यासाठी बाजीराव आपल्या दोन्ही तरुण मुलांसह विहिरीच्या काठावर उभे होते. मात्र, विहिरीच्या काठावर असलेली माती भुसभुशीत असल्यानं अचानक मोठा ढिगारा खाली खचला. विहीर खचल्यानं काठावर उभे असलेले तिघेही बाप-लेक विहिरीत कोसळले. त्यांच्या अंगावर मातीचा प्रचंड म ोठा ढिगारा पडल्यानं त्यांना सावरण्याची संधीच मिळाली नाही. रात्रीची वेळ असल्यानं मदत कार्यातही अडचणी आल्या. स्थानिकांनी आणि



नातेवाईकांनी तातडीने धाव घेऊन त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, मात्र मातीच्या ढिगाऱ्याखाली दबल्यानं तिघांचाही जागीच श्वास कोंडून मृत्यू झाला होता.

काकडे कुटुंब गावात मेहनती आणि मनमिळावू स्वभावासाठी ओळखले जात होते. आपली शेती फुलावी यासाठी ते दिवसरात्र विहिरीच्या कामात व्यस्त होते. दोन तरुण मुले आणि वडील अशा तिघांच्या एकाचवेळी झालेल्या निधनानं संपूर्ण गाव सुन्न झालं आहे. आई आणि कुटुंबातील इतर सदस्यांचा आक्रोश पाहून उपस्थित प्रत्येकाचे डोळे पाणावले होते.

# खरात प्रकरणात नेत्यांना वाचवण्याचा प्रयत्न : रोहित पवार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** अशोक खरात प्रकरणात अनेक मोठे नेते, अधिकारी आणि व्यावसायिक अडकल्याचा दावा रोहित पवार यांनी केला आहे. तसेच या प्रकरणातून नाव वगळण्यात यावे यासाठी मोठे आर्थिक रॅकेट सुरु असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अशोक खरात प्रकरणात खळबळजनक दावा केला आहे.

अशोक खरात प्रकरणात अनेक मोठे नेते, अधिकारी आणि व्यवसायिक असल्याचा दावा रोहित पवार यांनी केला आहे. तसेच या प्रकरणातून आपले नाव वगळले जावे यासाठी पैशांचं खूप मोठं रॅकेट काम करत असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला आहे. या रॅकेटमधून आपलं नाव निघावं यासाठी एक ट्रिक वापरली जात असल्याचं रोहित पवार यांनी म्हटलं आहे. रोहित पवार यांच्या या आरोपांमुळे प्रकरणाची व्याप्ती आणखी कितीतरी पटीने मोठी असेल का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. कारण आतापर्यंत जे समोर आलं आहे ते १ टक्के सुद्धा नाही. त्यापेक्षाही भीषण हे प्रकरण असल्याचा दावा रोहित पवार यांचा आहे. यामुळे या प्रकरणाबाबतचा सस्पेन्स आणखी वाढला आहे.



**■ भोंदू खरात प्रकरणात अनेक मोठे नेते, अधिकारी, व्यावसायिक अडकले आहेत. त्या प्रकरणातील १ टक्के सत्य देखील समोर आलेले नाही. समोर जे काही आले आहे ते केवळ छोटे मासे आहेत. यामध्ये अनेक मोठे मासे देखील आहेत.**

महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात काळा अध्याय म्हणून हे प्रकरण नोंद होणार आहे. या प्रकरणाच्या तपासातून सुटका करून घेण्यासाठी किंवा नाव बाजूला काढण्यासाठी एक मोठे आर्थिक रॅकेट काम करत असल्याची माहिती समजत आहे. मोठमोठ्या रकमा घेऊन अनेकांना यातून अलगद बाहेर काढले जात आहे, असा दावा रोहित पवार यांनी केला आहे.ज्यांना या प्रकरणातून बाहेर काढायचे आहे त्यांना भोंदू विरोधात फसवणूक केल्याची तक्रार करायला सांगितले जाते आणि या प्रकरणातून बाहेर काढले जाते, अशी ही पद्धती असल्याची माहिती आहे. या माहितीची शहानिशा करून गृहमंत्री खांनी योग्य ती कारवाई करावी असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.


# लावणीतील अश्लीलतेवर नियंत्रणासाठी स्वतंत्र सेन्सॉर बोर्डची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** लावणी आणि तमाशा सादरीकरणातील वाढत्या अश्लीलतेवर नियंत्रण आणण्यासाठी राज्य सरकारने स्वतंत्र सेन्सॉर बोर्ड स्थापन करावा, अशी मागणी तमाशा आणि लावणी कलावंतांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात निवेदन पाठविण्यात आले असून लवकरच मुख्यमंत्र्यांची भेट घेण्याचा निर्णय रविवारी पुण्यात झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेस चित्रपट आणि सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांच्या पुढाकाराने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस ज्येष्ठ लावणी कलाकार मंगला बनसोडे, बरखा जळगावकर, अप्सरा जळगावकर, राजश्री काळे-नगरकर, वनमाला बागूल यांच्यासह विविध लोककलावंत संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, डीजे लावणी प्रकारांवर शंभर टक्के बंदी घालण्याचा ठरावही बैठकीत एकमताने मंजूर करण्यात आला.



**■ बैठकीत पारंपरिक लावणी आणि तमाशा कला जतन करण्यावर भर देण्यात आला. डीजेच्या तालावर होणारे अश्लील नृत्यप्रकार लोककलेची प्रतिष्ठा घालवत आहेत. त्यामुळे अशा कार्यक्रमांवर निर्बंध आणण्यासाठी स्वतंत्र सेन्सॉर बोर्ड समिती स्थापन करावी, अशी मागणी करण्यात आली. ज्येष्ठ कलाकार मंगला बनसोडे यांनी लावणी आणि तमाशा ही महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख असल्याचे सांगत सरकारने पारंपरिक लोककलेला नवसंजीवनी द्यावी, असे मत व्यक्त केले.**

# पंतप्रधान मोदींचे देशवासियांना ऊर्जाबचतीचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**हैदराबाद :** पश्चिम आशियातील वाढत्या तणाव आणि ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना पेट्रोलियम उत्पादनांचा वापर जपून आणि गरजेनुसार करण्याचे आवाहन केले आहे. भारत मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल आणि इंधन आयात करत असल्याने पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा मर्यादित वापर करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तेलंगणाची राजधानी हैदराबाद येथे ९३७७ कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

पेट्रोलियम उत्पादनांचा योग्य वापर केल्यास परकीय चलनाची बचत होईल आणि युद्धजन्य परिस्थितीचे दुष्परिणाम कमी करण्यास मदत होईल, असे मोदी म्हणाले. यावेळी त्यांनी देशवासियांना नऊ महत्त्वाची आवाहने केली. पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करणे, खाद्यतेलाचा मर्यादित वापर, पुढील एक वर्ष सोन्याची खरेदी टाळणे, परदेश प्रवास कमी करणे, परकीय उत्पादनांची खरेदी मर्यादित ठेवणे, तसेच मेट्रो

**नवीकरणीय ऊर्जेबाबत बोलताना मोदी यांनी भारत सौर ऊर्जा उत्पादनात वेगाने प्रगती करत असल्याचे सांगितले. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाला प्रोत्साहन देऊन आयात इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यात यश मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.**

आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवण्याचे आवाहन त्यांनी केले.

वर्क फ्रॉम होम आणि ऑनलाईन बैठकींना प्राधान्य देण्याचेही त्यांनी सुचवले. परकीय चलन साठा सुरक्षित ठेवणे आणि कच्च्या तेलावरील अवलंबित्व कमी करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

दरम्यान, तेलंगणामध्ये राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे, औद्योगिक आणि पेट्रोलियम क्षेत्रातील ९३७७ कोटी



रुपयांच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये हैदराबाद-पणजी आर्थिक कॉरिडॉर, रेल्वे मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्प, ग्रीनफिल्ड पेट्रोलियम टर्मिनल आणि पीएम मित्र पार्कचा समावेश आहे.

संपादकीय

# आंदोलक हरवला, की राजकारणी गवसला?

महाराष्ट्राच्या राजकारणात 'आंदोलन' हा शब्द उच्चारला की डोळ्यांसमोर पहिले नाव येते, ते म्हणजे बच्चू कडू. कधी मंत्रालयाची पायरी चढून अधिकाऱ्याच्या कानशिलात लगावणारा, तर कधी सोनिया गांधींपासून नरेंद्र मोदींपर्यंत थेट भिडणारा हा नेता आज सत्तेच्या एका वळणावर अशा ठिकाणी उभा आहे, जिथे त्यांच्या मूळ अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे विलीनीकरण आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून स्वीकारलेली आमदारकी, हा केवळ एका नेत्याचा राजकीय प्रवास नसून तो महाराष्ट्रातील एका प्रस्थापित 'आंदोलनकारी पॅटर्न'च्या अंताची नांदी तर नाही ना, अशी शंका घेण्यास वाव देणारा आहे.

विद्यार्थी सेनेतून राजकारणाचे बाळकडू घेतलेले बच्चू कडू हे मुळचे शिवसैनिकच. मात्र, त्यांच्यातील बंडखोरीला खऱ्या अर्थाने धार चढली ती 'प्रहार'च्या माध्यमातून. शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टर जप्तीविरोधात केलेले 'सुतळी ॲटमबॉम्ब' आंदोलन असो, वा 'अर्ध दफन' आंदोलन; त्यांच्या प्रत्येक कृतीने सत्तेला घाम फोडला. आर. आर. आबांना जलकुंभावर चढायला लावणारा हा 'शोले स्टाइल' भिडू सामान्यांना आपला वाटला, कारण तो थेट व्यवस्थेच्या छाताडावर बसून जाब विचारत होता. 'बच्चू कडू सर्वांचा भिडू' ही त्यांची प्रतिमा अशाच संघर्षातून निर्माण झाली होती.

भाजप आणि बच्चू कडू यांचे नाते सुरुवातीपासूनच विळ्या-भोपळ्याचे राहिले आहे. १९९९ मधील अपक्ष उमेदवारीपासून सुरू झालेला हा संघर्ष आजच्या सत्तेच्या काळातही कायम आहे. भाजपने त्यांच्यावर 'सत्ताशरण' झाल्याचा आरोप



केला आहे, तर काहींना हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी भाजपला दिलेला शह वाटतो. गुवाहाटीच्या बंडात सहभागी होऊनही मंत्रिपद न मिळाल्याची सल आणि 'खोक्यां'च्या आरोपांमुळे झालेली बदनामी, यातून बाहेर पडण्यासाठी कडू यांनी अखेर विलीनीकरणाचा मार्ग निवडला असावा, असे तर्क वर्तवले जात आहेत. मात्र, ज्या प्रहार संघटनेने गावोगावी कार्यकर्त्यांचे जाळे विणले, तो कार्यकर्ता आज अस्वस्थ आहे.

बच्चू कडू यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी केवळ रस्तेच अडवले नाहीत, तर 'दिव्यांग' मंत्रालयासाठी दिलेला लढा ऐतिहासिक ठरला. दिव्यांगांच्या प्रश्नांवर त्यांनी केलेले काम निश्चितच कौतुकास्पद आहे. पण त्याच वेळी, कायदा हातात घेण्याची त्यांची वृत्तीकधी लाचखोर अधिकाऱ्याला मारहाण, तर कधी मंत्रालयात राडायामुळे त्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल झाले. भाजप आमदारांच्या मते, याच गुन्ह्यांपासून वाचण्यासाठी त्यांनी शरणागती पत्करली आहे. ''जनतेने संधी दिली असती तर नेत्याकडे गेलो नसतो,'' हे कडूंचे विधान त्यांच्यातील हतबलता दर्शवते की मतदारांवरची नाराजी? हा संशोधनाचा विषय आहे.

आज कडू यांनी धनुष्यबाण हाती घेतला असला तरी, त्यांच्यासमोर आव्हाने डोंगराएवढी आहेत. 'प्रहार'चा कार्यकर्ता आणि शिवसेनेचा जुना कार्यकर्ता यांच्यात जागावाटपावरून संघर्ष झाला तर कडू कोणाची बाजू घेणार? सत्तेत बसल्यावर ते अधिकाऱ्यांविरुद्ध पूर्वीसारखेच हात उगारणार का? की सत्तेच्या ऊबेत त्यांचा आंदोलनाचा 'आसूड' म्यान होणार?

सामान्य जनतेला आज अशी भीती वाटतेय की, सत्तेच्या या साठमारीत कडू यांच्यातील तो जिगरबाज 'आंदोलक' हरवू नये. जर त्यांनी आपली मूळ वृत्ती सोडली, तर 'सर्वांचा भिडू' असणारा हा नेता उद्या केवळ 'सर्वांना भिडणारा' राजकीय नेता उरेल. राजकारणात टिकण्यासाठी तडजोडी कराव्या लागतात हे खरे असले, तरी ज्या जनतेने त्यांना सलग चार वेळा अपक्ष म्हणून निवडून दिले, त्या जनतेचा विश्वास सत्तेपेक्षा मोठा असतो.

बच्चू कडू यांचा शिवसेनेतील प्रवेश हा त्यांच्या राजकीय भविष्याची नवी दिशा ठरवणारा आहे. त्यांनी घेतलेला हा निर्णय 'राजकीय सुरक्षितता' देणारा ठरला तरी, 'राजकीय उंची' देणारा ठरेल का, हे येणारा काळच सांगेल. महाराष्ट्राला एका तडफदार आंदोलकाची गरज आहे, एका साध्या सत्तेच्या पाईकाची नाही. कडू यांनी आपली आंदोलनाची धार टिकवून ठेवली तरच त्यांच्या या 'राजकीय संशोधना'ला काही अर्थ उरेल, अन्यथा इतिहासात त्यांची नोंद एका प्रस्थापित व्यवस्थेपुढे झुकलेला नेता म्हणूनच होईल.

## तरुणाला मारहाण, खिशातील रक्कम व सोन्याची चैन लांबविली

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** मित्रांना मोटरसायकलवर घरी सोडण्यासाठी जात असताना आरोपींनी अविनाश खेमनर या तरुणाला शिवीगाळ करुन लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर त्याच्या खिशातील रोख रक्कम व गळ्यातील सोन्याची चैन जबरदस्तीने काढुन घेतली. ही घटना दि. ५ मे रोजी रात्रीच्या सुमारास राहुरी शहरातील १८ एकर परीसरात घडली.

अविनाश दत्तात्रय खेमनर, वय २१ वर्षे, रा. निंभारे ता. नेवासा हा तरुण त्याचा मित्र प्रशांत अशोक विटनोर, रा. मांजरी, ता. राहुरी हे दोघे दि. ५ मे २०२६ रोजी सायंकाळी मोटरसायकलवर वडनेर येथे एका कार्यक्रमासाठी गेले होते. तेथून परत येत असताना रात्री ११ वाजे दरम्यान ते दोघे राहुरी शहरातील पाण्याच्या टाकी जवळील राम प्यारे पान स्टॉल येथे पाणी पिण्यासाठी थांबले. त्यावेळी अविनाश खेमनर याच्या ओळखीचा ओंकार साळवे व त्याचे दोन मित्र भेटले. तेव्हा ओंकार साळवे हा अविनाश खेमनर याला म्हणाला कि, तु मला व माझ्या दोन मित्रांना माझ्या घराजवळ सोड. अविनाश खेमनर याने त्याच्या मित्राला रामप्यारे पान स्टॉल जवळ थांबायला सांगितले. आणि मोटरसायकलवर आरोपींना बसवून घेऊन जात असताना आरोपीने त्याला १८ एकर परिसरात थांबवीले.

तेव्हा आरोपींनी अविनाश खेमनर याला काही एक कारण नसताना शिवीगाळ करुन लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर त्याच्या खिशातील २० हजार रुपए व मोबाईल तसेच गळ्यातील एक तोळा वजनाची सोन्याची चैन जबरदस्तीने काढुन घेतली. त्यानंतर खेमनर याच्या मोबाईलवरुन फोन पे करून कोणाच्या तरी अंकाऊंटवर १८० रुपए टाकले. त्यानंतर जर तु पोलीस स्टेशनला तक्रार दिली तर तुला मारून टाकु, अशी धमकी दिली. तसेच आरोपी खेमनर याची मोटरसायकल देखील घेऊन गेले. अविनाश दत्तात्रय खेमनर याच्या फिर्यादीवरून आरोपी ओंकार सुखदेव साळवे, रा. राहुरी बुद्रुक, ता. राहुरी, व दोन अनोळखी तरुण अशा तीन जणांवर शिवीगाळ, मारहाण व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

## राहाता येथे आमदार विवेक कोल्हे यांचा सत्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



राहाता : नुकतेच विधानपरिषदेवर निवडून गेलेले युवा, अभ्यासू व तडफदार आमदार विवेक भैय्या कोल्हे यांचा राहाता येथे भाजपा नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांच्या हस्ते उत्साहपूर्ण सत्कार करण्यात आला. यावेळी विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. समारंभास धनंजय गाडेकर, आरपीआयचे नेते दिलीपराव वाघमारे, मनसेचे विजय मोगले, नगरसेवक शशिकांत लोळगे, सुनिल बोठे, रणजित बोठे, निवृत्ती गाडेकर, अभिजित काळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

यावेळी आमदार विवेक भैय्या कोल्हे यांनी कार्यकर्ते, पदाधिकारी व मित्रपरिवारासमवेत मनमोकळा संवाद साधत जुन्या आठवणींना उजाळा दिला. सामाजिक व राजकीय प्रवासातील विविध अनुभव त्यांनी उपस्थितांसमोर मांडले. त्यांच्या साध्या, आपुलकीच्या आणि कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधणाऱ्या स्वभावामुळे उपस्थितांमध्ये विशेष उत्साह निर्माण झाला. राजकारणात तरुण नेतृत्वाची गरज असताना विवेक कोल्हे यांच्यासारखा अभ्यासू, धडाडीचा व जनसामान्यांच्या प्रश्नांवर भक्कम भूमिका घेणारा नेता विधानपरिषदेत पोहोचल्याने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

भाजपा नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, विवेक भैय्या कोल्हे यांचे नेतृत्व युवकांसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले जातील. त्यांच्या निवडीमुळे सर्वसामान्य कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा मिळाली आहे.

# ऊस दर नियंत्रण कायदा २०२६ वर हरकती

## साखर आयुक्तांकडे सुधारणा प्रस्ताव सादर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : भारत सरकारने चर्चेसाठी प्रसिद्ध केलेल्या ऊस दर नियंत्रण कायदा २०२६ या मसुद्यावर महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताच्या हरकती, सुधारणा आणि धोरणात्मक प्रस्ताव साखर आयुक्त, पुणे यांच्याकडे ई-मेलद्वारे सादर करण्यात आले आहेत. एफआरपीला कायदेशीर हमी, पारदर्शक रिकव्हरी, वेळेत ऊस बिल अदा करणे आणि शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देणाऱ्या तरतुदी नव्या कायद्यात समाविष्ट करण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे. दि. ११ मे रोजी आयोजित बैठकीपूर्वी शेतकरी संघटनांची भूमिका शासनाच्या निदर्शनास यावी, यासाठी भारतीय किसान श्रमिक जनशक्ती युनियनचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष नरेंद्र पाटील काळे यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने हे निवेदन सादर केले. नव्या कायद्यात शेतकरी न्याय, आर्थिक सुरक्षा, पारदर्शकता आणि कायदेशीर संरक्षण यांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकरी सध्या गंभीर आर्थिक, प्रशासकीय आणि व्यवस्थात्मक अडचणींना सामोरे जात असून अनेक ठिकाणी अन्यायकारक अटी, अपारदर्शक व्यवहार आणि आर्थिक शोषणाच्या तक्रारी सातत्याने समोर येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ऊस उत्पादक हा साखर उद्योगाचा पाया असूनही त्याच्या हक्कांच्या संरक्षणासाठी सक्षम कायदेशीर यंत्रणा नसल्याची खंतही व्यक्त करण्यात आली. एफआरपीला कायदेशीर हमीभावाचा दर्जा द्यावा, तसेच एफआरपीपेक्षा कमी दराने ऊस खरेदी करणाऱ्या साखर कारखान्यांवर फौजदारी कारवाईची स्पष्ट तरतूद नव्या कायद्यात असावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. ऊस दर निश्चित करताना C2 + ५० टक्के हे सूत्र लागू करून उत्पादन खर्च, कुटुंब मजुरी, पाणी, वीज, खत, मजुरी, जोखीम आणि इतर शेती खर्चांचा



समावेश करावा, असेही निवेदनात म्हटले आहे. शेतकऱ्यांचे ऊस बिल १४ दिवसांच्या आत देणे कायदेशीर बंधनकारक करावे, विलंब झाल्यास स्वयंचलित व्याज लागू करावे आणि थकीत रक्कम महसूल थकबाकीप्रमाणे वसूल करण्याची तरतूद करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सर्व देयके थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात डीबीटी प्रणालीद्वारे जमा करावीत, असेही सुचविण्यात आले आहे. प्रत्येक वजन काट्यावर डिजिटल सीसीटीव्ही, ऑनलाइन डेटा प्रणाली आणि तत्काळ एसएमएस पावती बंधनकारक करावी. वजन काट्यांची तृतीय पक्षाकडून नियमित तपासणी व्हावी तसेच फसवणूक आढळल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

रिकव्हरी चोरी रोखण्यासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा व्यवस्था, व्हिडिओ रेकॉर्डिंगसह रिकव्हरी तपासणी आणि प्रत्येक शेतकऱ्याला रिकव्हरी रिपोर्ट देणे बंधनकारक करावे, अशी भूमिका मांडण्यात आली आहे. इथेनॉल, प्रेसमड, बगॅस, वीज निर्मिती आणि इतर उपउत्पादनांच्या नफ्यात शेतकऱ्यांना हिस्सा मिळावा यासाठी रेव्हेन्यू शेअरिंग फॉर्म्युला लागू करावा, अशीही मागणी करण्यात आली. याशिवाय प्रत्येक साखर कारखान्यात शेतकरी हक्क संरक्षण समिती स्थापन करावी, स्वतंत्र तक्रार निवारण प्राधिकरण उभारावे, तक्रारींवर ३० दिवसांत निर्णय द्यावा, तोडणी-वाहतूक प्रक्रियेत पारदर्शकता आणावी आणि शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय कोणतीही कपात करू नये, अशा महत्त्वपूर्ण सूचना निवेदनात करण्यात आल्या आहेत.

> **आज शेतकरी फक्त ऊस उत्पादक राहिलेला नाही, तर तो संपूर्ण साखर उद्योगाला आधार देणारा मुख्य घटक आहे. त्यामुळे 'ऊस दर नियंत्रण कायदा २०२६' हा केवळ उद्योगकेंद्रित न राहता शेतकरी न्याय, आर्थिक सुरक्षा आणि पारदर्शकतेवर आधारित असणे आवश्यक आहे.**
>
> **नरेंद्र काळे**
> **नेवासा**

## नेवासा येथे संत साहित्य अभ्यास केंद्राची मागणी


प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा**नेवासा तीर्थक्षेत्र येथे संत साहित्य अभ्यास केंद्र सुरू करून मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी शासनाने निर्णय घ्यावा, अशी मागणी माजी कुलगुरू डॉ. अशोक ढगे यांनी मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. आमदार विठ्ठलराव लंघे यांनीही या विषयावर मंत्र्यांसमवेत चर्चा करून कार्यवाहीची मागणी केली. नेवासा फाटा येथील रेणुका माता सभागृहात मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांची मार्गदर्शनपर सभा झाली. यावेळी डॉ. ढगे यांनी नेवासा येथे संत साहित्य अभ्यास केंद्र स्थापन करण्याबाबत निवेदन सादर केले. निवेदनात नमूद करण्यात आले की, नेवासा ही संत परंपरेची पवित्र भूमी असून येथे संत, महंत, वारकरी व संत साहित्याचे अभ्यासक मोठ्या संख्येने आहेत. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनी जगप्रसिद्ध ज्ञानेश्वरी ग्रंथाची निर्मिती तसेच 'पसायदान' ही विश्वप्रार्थना याच भूमीत केली. या ऐतिहासिक वारशाच्या जतनासाठी नेवासा येथे संत साहित्याचे जागतिक दर्जाचे अभ्यास केंद्र उभारावे व पुढे त्याचे रूपांतर संत विद्यापीठात करावे, अशी मागणी डॉ. ढगे यांनी केली. या मागणीला परिसरातून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

## मधुमेह व रक्तदाबाच्या रुग्णांनी उन्हाळ्यात काळजी घ्यावी : डॉ. अक्षय शिरसाट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार** :यावर्षीचा उन्हाळा तीव्र स्वरूपाचा असून दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. ४० अंशाच्या वर तापमान केल्याने जिल्ह्यात उष्माघाताच्या रुग्णांची संख्या वाढते आहे. तर काही व्यक्ती उष्माघातामुळे बळी गेले आहेत. वाढत्या तापमानात नागरिकांनी बाहेर पडणे टाळावे विशेषता रक्तदाब व मधुमेह असलेल्या रुग्णांनी विशेष काळजी घ्यावी असे आवाहन कोल्हार येथील सुप्रसिद्ध हृदय रोग तज्ञ डॉ. अक्षय शिरसाट यांनी दैनिक राष्ट्र सह्याद्रीशी बोलताना केले आहे.



डॉ. अक्षय शिरसाठ यावेळी बोलताना म्हटले की, वाढत्या तापमानामध्ये शरीराचे तापमान हे जास्त वाढते. त्यामुळे हृदयाचे ठोके वाढणे, घाम जास्त येणे, चक्कर येणे, तोंडाला कोरड पडणे, मेंदूवर ताण पडणे, असे उष्माघाताचे लक्षण दिसून येतात. परंतु याकडे दुर्लक्ष न करता तातडीने वैद्यकीय सल्ला घेऊन उपचार घेणे महत्त्वाचे आहे. वाढत्या तापमानात शरीर डीहायड्रेट होत असल्यामुळे पाणी भरपूर पिणे टरबुजा सारखे पाणीदार फळे खाणे लिंबू पाणी शरबत व नारळ पाणी घेणे, मधुमेह रक्त दाबाच्या रुग्णांनी मिठाचे व साखरेचे प्रमाण कमी ठेवून पाण्याचे प्रमाण वाढवावे व मधुमेहाच्या व रक्तदाबाच्या गोळ्या नियमितपणे घ्याव्यात उन्हात बाहेर जाताना छत्री व पांढरा कपड्याचा वापर करावा डोक्याला पांढरे उपरणे बांधावे व उष्माघाताच्या बाबतीत काही लक्षणे आढळल्यास तात्काळ डॉक्टरांशी संपर्क साधावा यामुळे असेही आवाहन डॉ. अक्षय शिरसाट यांनी दै. राष्ट्र सह्याद्रीशी बोलताना केले आहे.

## भानसहिवरा जि प गटाच्या शिवसेना विभाग प्रमुखपदी गणेश झगरे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील भानसहिवरा जिल्हा परिषद गटाच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना विभाग प्रमुखपदी तसेच नेवासा तालुका मीडिया प्रमुखपदी नेवासा तालुक्यातील मक्तापुर येथील लढवय्ये कार्यकर्ते व मराठा सुकाणू समितीचे प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेनेचे नेते उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवा नेते आदित्य ठाकरे यांच्या आदेशाने जिल्हा उपप्रमुख हरिभाऊ शेळके यांनी त्यांना नियुक्तीचे पत्र दिले आहे.

नेवासा तालुक्यासह भानसहिवरा जिल्हा परिषद गटामध्ये शिवसेनेच्या शाखा स्थापन करून हिंदू हदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार तळागाळात पोहचविण्यासाठी आपण काम करणार असून सर्व निष्ठावंत सैनिकांना बरोबर घेऊन समाजातील प्रश्न सोडवण्यासाठी रस्त्यावर येऊ व सर्वसामान्य माणूस व उपेक्षित घटक केंद्रबिंदू मानून आपण काम करत राहू. असा निर्धार गणेश झगरे यांनी निवडीनंतर बोलतांना व्यक्त केला.

गणेश झगरे यांच्या नियुक्ती बद्दल त्यांचे शिवसेनेचे नेते रामदास गोल्हार,जिल्हा प्रमुख रावसाहेब खेवरे,उपजिल्हा प्रमुख हरिभाऊ शेळके,शिवसेना प्रणित शिवसहकार सेनेचे राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार, तालुका प्रमुख मच्छिंद्र म्हस्के, उपप्रमुख मुन्ना चक्रनारायण, शिवसेना शहर प्रमुख नितीन जगताप, योगेश राऊत, बादल परदेशी,आबासाहेब शिरसाठ,सचिन गायकवाड गणेश चौगुले यांच्यासह निष्ठावंत शिवसैनिकांनी अभिनंदन केले आहे.

## विमा दावा नाकारल्याने स्टार हेल्थ कंपनीला दणका

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड यांनी विमा दावा अन्यायकारकरित्या नाकारल्याप्रकरणी अहिल्यानगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने श्रीरामपूर येथील मोहित संजय कोठारी यांच्या बाजूने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. आयोगाने कंपनीला विमा दाव्याची रु. ४३,९६५ रक्कम तसेच १४ एप्रिल २०२३ पासून प्रत्यक्ष रक्कम मिळेपर्यंत ९ टक्के व्याजासह अदा करण्याचे आदेश दिले आहेत. याशिवाय मानसिक व शारीरिक त्रासापोटी रु. १५,००० आणि तक्रार खर्चापोटी रु. १०,००० देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अहिल्यानगर जिल्हा ग्राहक आयोगाचे अध्यक्ष सादिक अली बी. सय्यद तसेच सदस्या चारू विनोद डोंगरे व संध्या श्रीपती कसबे यांनी हा निर्णय दिला. मोहित कोठारी यांनी आपल्या कुटुंबासाठी स्टार हेल्थकडे आरोग्य विमा पॉलिसी घेतली होती. विमा कालावधीत त्यांच्या पत्नी पूजा कोठारी यांना आजारपणामुळे डॉ. शिरसाठ यांच्या रुग्णालयात दाखल करावे लागले. उपचार खर्चाची परतफेड मिळावी म्हणून सर्व कागदपत्रांसह विमा दावा सादर करण्यात आला. मात्र कागदपत्रांत विसंगती असून उपचाराबाबत स्पष्ट पुरावा नसल्याचे कारण देत कंपनीने दावा नाकारला.

यानंतर कोठारी यांनी ॲड. सुनील मुंदडा यांच्यामार्फत ग्राहक आयोगात तक्रार दाखल केली. सुनावणीदरम्यान दोन्ही बाजूंची कागदपत्रे व युक्तिवाद तपासल्यानंतर आयोगाने विमा कंपनीची भूमिका अयोग्य ठरवत दावा नाकारणे ही सेवेतील त्रुटी असल्याचे स्पष्ट केले. या निकालामुळे योग्य विमा दावे टाळाटाळ करून नाकारणाऱ्या कंपन्यांना चपराक बसली असून विमाधारकांना ग्राहक आयोगातून न्याय मिळू शकतो, असा संदेश या निर्णयातून मिळाला आहे.

## चंद्रगिरी विद्यालयाचा दहावीचा निकाल ९१.३० टक्के




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहतालुक्यातील मांजरी येथील चंद्रगिरी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने दहावीच्या निकालाची आपली परंपरा कायम राखली असून या विद्यालयाचा निकाल ९१.३० टक्के लागला असून शाळेत एकूण ४६ विद्यार्थी परीक्षेसाठी बसलेले होते यापैकी ४२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यात समीक्षा दादासाहेब भगत ही विद्यार्थिनी ८७.२० टक्के गुण मिळवत विद्यालयात प्रथम आली असून द्वितीय विद्यार्थिनी सुप्रिया सुनील विटनोर ८६ टक्के गुण मिळाले तर तनुजा योगेश विटनोर या विद्यार्थिनीस ८४.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने विद्यालयात उत्तीर्ण झाली आहे.

त्यांच्या या उज्ज्वल यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य रामदास गोडे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन केले.

## लोटस स्कूलचा शंभर टक्के निकाल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : श्री क्षेत्र शनिशिंगनापूर येथील अल्पवाधित नावाजलेली लोटस इंग्लिश मेडियम स्कूलचा फेब्रुवारी मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एस एस सी इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल सलग तिसऱ्या वर्षी १००% (टक्के) लागुन हॅट्रिक केली आहे. या विद्यालयात विद्यार्थिनी मनस्वी आढाव ९२% मार्कसह प्रथम , तनुश्री साबळे ९१% मार्कसह द्वितीय तर प्रणिता शेटे ९०% मार्कसह तृतीय क्रमांक मिळविला आहे.

समर्थ शेटे ८९.४०%, चैतन्य निकम ८७.६०%, समृद्धी शेटे ८७%, श्लोक बानकर ८६.२०%, सिद्धार्थ बानकर ८५.२०%, दिशा जेधे ८३.८०% , कृष्णा चौधरी ७९.८०%, वैष्णवी कुऱ्हाट ७८.२०%, देवेंद्र महाले ७६.२०% , ऋतुजा दरंदले ७६% व श्रावणी बानकर ७४.६०% मार्क्स मिळवत उत्तीर्ण झाले आहेत. या निकालासाठी शाळेच्या प्राचार्या सौ. मंगल बानकर ,आसाराम बोर्डे, सतपाल साळवे, अविनाश दरंदले, विद्या बोरुडे, अंबिका लाटे व उर्मिला



ठोंबळ या शिक्षकांनी परिश्रम घेतले.

सर्व विद्यार्थ्यांचे पालकांचे व शिक्षकांचे संस्थेच्या वतीने डॉ.रावसाहेब बानकर यांनी तसेच सर्व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

## विद्यार्थी मृत्यूप्रकरणी कृषी महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठातांची बदली

**पुणे** : महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या पुणे येथील कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता कृषी महाविद्यालयाचे डॉ. महानंद माने यांची बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी शासकीय कृषी महाविद्यालयातील उद्यानविद्या विभागाचे प्राध्यापक डॉ. सुभाष गणपत भालेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शनिवारी (दि. ९) त्यांनी अतिरिक्त पदभार स्वीकारला. मार्च महिन्यात शिवाजीनगर येथील कृषी महाविद्यालयात 'कृषी व्यवसाय व्यवस्थापन' अभ्यासक्रमाचा विद्यार्थी चैतन्य चव्हाण याचा मेसमध्ये विजेचा धक्का लागून मृत्यू झाला होता. या घटनेनंतर विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. दोषींवर कारवाईच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी आंदोलनही केले होते. या प्रकरणाची दखल घेत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विद्यार्थ्यांची भेट घेऊन कृषी विद्यापीठांच्या इमारतींचे ऑडिट करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी घटनास्थळी भेट देत आंदोलक विद्यार्थ्यांशी चर्चा केली होती. त्यानंतर विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. सातप्पा खरबडे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच डॉ. माने यांची बदली करण्यात आल्याची माहिती विद्यापीठ सूत्रांनी दिली. डॉ. माने यांची बदली राहुरी येथील डॉ. अ. शिं. कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात अधिष्ठाता (जलसिंचन अभियांत्रिकी व निचरा) म्हणून करण्यात आली आहे. तसेच नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील काष्टी येथे छत्रपती शिवाजी महाराज कृषिविज्ञान संकुल प्रमुख पदाचा अतिरिक्त पदभारही त्यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

### डॉ. भालेकर यांची विद्यापीठात ३३ वर्षांची प्रदीर्घ सेवा

दरम्यान, डॉ. सुभाष भालेकर यांनी कृषी पदव्युत्तर पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण केले असून, उद्यानविद्या विषयात ते पीएच.डी. पदवीप्राप्त आहेत. त्यांनी गणेशखिंड येथील विभागीय कृषी संशोधन केंद्रात ७ मे १९९३ रोजी वरिष्ठ संशोधन सहायक या पदावर प्रथम काम केले. त्यानंतर भाजीपाला पिकामध्ये घोसाळी-फुले प्राजक्ता, भेंडी-फुले उत्कर्ष, श्रावण घेवडा-फुले सुयश, गणेश ब्रोकली, वाल-फुले सुरुची, सलाड-फुले पद्म, पपया-फुले विजया, लोणच्यासाठी आंबा फुले अभिरुची हे वाण विकसित केले. त्यानंतर कांदा पैदासकार म्हणून महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे काम केले. त्यांनी विद्यापीठार्तगत विविध पदावर काम केले आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द•ख•ल

### ईश्वरी सांबारे हिचे सुयश



**पुणतांबा** : परिसरातील चांगदेव नगर येथील ईश्वरी प्रसाद सांबारे ह्या विद्यार्थीने नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता १०वीच्या परिक्षेत ७७ .६० % गुण मिळून येथील रुरल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात गुणाणुक्रमे चौथा क्रमाक लमिळून घवघवीत यश संपादन केले आहे. तिला मुख्याध्यापक संजय थोरात पर्यक्षेक्षक , शिक्षक व शिक्षकेतर वर्ग यांचे मार्गदर्शन मिळाले. चांगदेव नगर येथील सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब सांबारे यांची ती नात आहे. तिच्या यशाबद्दल तिचे आ. विवेक कोल्हे माजी सरपंच सुधाकर जाधव, भाऊसाहेब जेजूरकर प्राचार्य डॉ बखळे संदीप गुंजाळ वंसत धनवटे राजू शेख सह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तिचे कौतुक केले आहे.

### श्री छत्रपती शिवाजी विद्यालयातील मुलांनी बोर्डाच्या परीक्षेत मारली बाजी

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचा एसएससी बोर्ड परीक्षेचा शेकडा निकाल ८७.९३ टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.यावर्षी प्रथम तीन क्रमांकामध्ये मुलांनी बाजी मारली आहे. विद्यालयातील जितेंद्र तात्याराव पवार या विद्यार्थ्याने ८५ % गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तर सार्थक बाबासाहेब कसार हा विद्यार्थी ८२ . ६० % गुण मिळवून द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. तसेच ओम माधव उघडे हा विद्यार्थी ८१ % गुण मिळवून विद्यालयात तिसरा आला आहे.विद्यालयाचा सेमी विभागाचा निकाल १००% टक्के लागला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

### छत्रपती शिवाजी विद्यालयाचा निकाल१०० टक्के आर्यन आंबरे केंद्रात प्रथम



**गणोरे** : येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी विद्यालय चा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा १०० टक्के निकाल लागला लागला असुन आर्यन विवेक आंबे या विद्यार्थ्याला ९५..८० टक्के गुण मिळवुन केंद्रात प्रथम क्रेंद्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. विद्यालयातून विशेष प्राविण्य मध्ये ३० विद्यार्थी, प्रथम श्रेणीतून ३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. द्वितीय श्रेणीत १८ तर २ विद्यार्थी तृतीय श्रेणीत पास झाले आहेत. विद्यालयातून आयर्न विवेक आंबरे ९५.८० % प्रथम, समृद्धी बबन एखंडे ९५ % द्वितीय, वैष्णवी भीमाशंकर गडाख ९४.४० % तृतीय, समृद्धी संदीप खतोडे ९०.२०% चतुर्थ, सार्थक नितीन बोंबले ८८.४० % पंचम क्रमांक मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातील सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य मनोज कवडे उत्तर विभागीय सहाय्यक सल्लागार अंबादास दातीर स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष संत नामदेव आंबरे, सरपंच संतोष आंबरे , ग्रामस्थ, पालक, शिक्षणप्रेमी आदी नी अभिनंदन केले आहे.

### सोपान महाराज शास्त्री यांची सोनेवाडीत भागवत कथा

**कोपरगाव** : तालुक्यातील सोनेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा शताब्दी महोत्सव सोहळा दि १२ मे ते दि १७ मे २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे. या निमित्ताने सोपान महाराज शास्त्री यांची श्रीमद् भागवत कथा व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती नियोजन समितीने दिली आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री ना. दादासाहेब भुसे, जिल्ह्याचे पालकमंत्री ना .राधाकृष्ण विखे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, मा. खा. सदाशिव लोखंडे, आ. आशुतोष काळे ,आ विवेक कोल्हे, आ. सत्यजित तांबे, माजी आ. स्नेहलता कोल्हे, गोदावरी दुध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे, शिवसेना जिल्हाप्रमुख नितीनराव औताडे, कोपरगावचे नगराध्यक्ष पराग संदान अदीसह शाळेचे सेवानिवृत्त शिक्षक माजी विद्यार्थी ग्रामस्थ उपस्थित रहाणार आहेत. मंगळवार दिनांक १२ मे रोजी श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले. हनुमान मंदिराच्या समोर दररोज रात्री ७ ते १०.३० या वेळेत भागवत कथा प्रवक्ते सोपान महाराज शास्त्री हिंगोली यांच्या वाणीतून श्रोत्यांना भागवत कथा श्रवण करण्याचा आनंद मिळणार आहे. भागवत कथेची सांगता १६ मे रोजी होणार आहे व शताब्दी महोत्सव कार्यक्रमाची सांगता १७ मे रोजी सायं ५ ते ८ यावेळेत वरद विनायक देवस्थानचे महंत उद्धव महाराज मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली वरील मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

या कार्यक्रमासाठी राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रमाचे मंहत रमेशगिरी महाराज, राघवेश्वर देवस्थानचे महंत राघवेश्वरानंद गिरीजी महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रमाचे महंत परमानंद महाराज,शारदांनंद माताजी, देर्डे चांदवड येथील सरलादिदी, भागवताचार्य मनसुख महाराज दहे, भागवताचार्य कविताताई साबळे , ईश्वरीताई जावळे अदी अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. १२ मे ते १७ मे दरम्यान दररोज सामाजिक ,धार्मिक, शैक्षणिक , वैद्यकीय व विधीज्ञ क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या १० मान्यवर मंडळींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

# शिक्षणासोबत संस्कारांची जोड काळाची गरज : डॉ. सुस्मिता विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : आजच्या आधुनिक आणि स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकातील शिक्षण देऊन चालणार नाही, तर त्यांच्यावर योग्य संस्कार होणेही तितकेच आवश्यक आहे. शिक्षणासोबत मूल्य शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि अध्यात्मिक विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचे कार्य प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था सातत्याने करत असून श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचे कार्य विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक ठरत आहे, असे प्रतिपादन लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे यांनी केले.



दुर्गापूर येथे आयोजित श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्राच्या २८ व्या वर्धापन दिन कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सन्मान करताना डॉ. सुस्मिता विखे व मान्यवर.

राहाता तालुक्यातील दुर्गापूर येथे श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्राच्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमास ट्रक वाहतूक संस्थेचे उपाध्यक्ष सुनील जाधव, श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे जिल्हा प्रतिनिधी रावसाहेब शेजुळ, सोपानराव पुलाटे, ज्येष्ठ साहित्यिक यशवंत पुलाटे, प्रवरा माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या संध्या रोकडे, ज्येष्ठ सेवेकरी वेणूनाथ पुलाटे, प्रकाश पुलाटे, केंद्र प्रतिनिधी मंगलताई पुलाटे, मंगेश मनकर यांच्यासह परिसरातील स्वामी समर्थ सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात गावातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व नाविन्यपूर्ण यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा डॉ. सुस्मिता विखे व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशामुळे पालक व ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी बोलताना डॉ. विखे म्हणाल्या, आजच्या काळात शिक्षणाबरोबरच मूल्य शिक्षणाची नितांत गरज आहे. विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता, संस्कार आणि भारतीय संस्कृतीची जाणीव निर्माण व्हावी, यासाठी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था विविध उपक्रम राबवत आहे. वारी पंढरीची, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय परंपरा, अध्यात्म आणि सामाजिक मूल्यांची ओळख करून दिली जाते. सण-उत्सवामागील सामाजिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक परंपरा विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजाबद्दल कर्तव्यभावना निर्माण होत असून आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो ही भावना विकसित होत आहे.

प्रवरेच्या माध्यमातून संस्कारक्षम, जबाबदार आणि देशहिताचा विचार करणारे आदर्श विद्यार्थी घडविण्याचे कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. रावसाहेब शेजुळ यांनी गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालून आदर्श समाजनिर्मितीचे कार्य सुरू असल्याचे सांगितले. कार्यक्रमात मंगेश बनकर व प्रकाश पुलाटे यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. रमेश जाधव यांनी केले, तर आभार डॉ. रवींद्र जाधव यांनी मानले.

## शिवसेना प्रणित युवा सेना विधानसभा संपर्क प्रमुखपदी अभिजित दारकुंडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : तालुका शिवसेना शिंदे गट प्रणित युवा सेना विधानसभा संपर्क प्रमुखपदी नेवासा तालुक्यातील पुनतगाव येथील युवा कार्यकर्ते अभिजित बापूसाहेब दारकुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शिवसेना नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे,खा.डॉ. श्रीकांतजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेशभाई सरनाईक, युवासेना उत्तर महाराष्ट्र सचिव अविष्कार भुसे यांच्या आदेशानुसार व लोकसभा संपर्क प्रमुख सिद्धेश अभंगे जिल्हाप्रमुख शुभम वाघ,नेवासा तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे,युवासेना तालुका प्रमुख अजय डौले यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड युवासेना सदस्य नोंदणी अभियानासाठी करण्यात आली असल्याचे नियुक्ती पत्रात म्हटले आहे.

अभिजित दारकुंडे यांच्या निवडीचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील,उद्योजक प्रभाकरराव शिंदे पाटील, शिवसेना तालुका विधानसभा प्रमुख भाऊसाहेब वाघ, नगराध्यक्ष डॉ.करणंसिंह घुले पाटील,शिवसेना महिला आघाडीच्या प्रमुख सौ.शोभाताई आलवणे,नगरसेवक प्रविण अप्पा सरोदे,अंकुश म्हस्के,कृष्णा परदेशी,अनिल पवार यांच्यासह शिवसैनिक पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## यशवंतराव गडाख यांच्या वाढदिवसानिमित्त सोनईत कौतुकी नदी पुनरुज्जीवन उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकार, समाजकारण, राजकारण आणि साहित्य क्षेत्रातील उत्तुंग व्यक्तिमत्त्व असलेले ज्येष्ठ नेते तथा माजी खासदार यशवंतराव गडाख पाटील यांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त सोनई येथे कौतुकी नदी पुनरुज्जीवन व सुशोभीकरण उपक्रम हाती घेण्यात येणार आहे. यशवंत सामाजिक प्रतिष्ठानच्या पुढाकारातून तसेच सोनई ग्रामस्थ, विविध सामाजिक संस्था-संघटनांच्या सक्रिय सहभागातून हा लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी दिली.

मुळा उद्योग समूहाचे संस्थापक तसेच नेवासा तालुका व जिल्ह्याच्या सहकार, शैक्षणिक आणि सामाजिक प्रगतीचे शिल्पकार म्हणून ओळख असलेल्या यशवंतराव गडाख यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा व कौतुकी नदी स्वच्छता अभियानाचा शुभारंभ मंगळवार, दि. १२ मे रोजी सकाळी ९ वाजता रामझिरा मंदिर, सोनई (ता. नेवासा) येथे आयोजित करण्यात आला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही यशवंतराव गडाख यांच्या संकल्पनेनुसार वाढदिवस साधेपणाने साजरा करत समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य देण्यात आले आहे.

डामडौल, बॅनरबाजी आणि आतषबाजी यांसारख्या अनावश्यक खर्चांना फाटा देत लोकांसाठी दीर्घकाळ उपयोगी पडतील असे उपक्रम राबविण्याची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली आहे. सोनई शहराची जीवनदायिनी मानली जाणारी कौतुकी नदी गेल्या काही दिवसांपासून दुर्लक्षित झाली आहे. वाढती लोकसंख्या, नदीपात्रात टाकला जाणारा कचरा तसेच सांडपाण्यामुळे नदी परिसर अस्वच्छ झाला आहे. त्यामुळे नदीचे खोलीकरण, स्वच्छता आणि सुशोभीकरण करून तिचे पुनरुज्जीवन करण्याचा संकल्प यंदा करण्यात आला आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ श्री संत ज्ञानेश्वर संस्थान, नेवासाचे वेदांताचार्य ह.भ.प. देवीदास म्हस्के महाराज यांच्या शुभहस्ते होणार असून ज्येष्ठ साहित्यिक यशवंतराव गडाख यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास नेवासा तालुक्यातील युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी केले आहे. यापूर्वीही यशवंत सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून यशवंतराव गडाख यांच्या प्रेरणेने गाव दत्तक उपक्रम, 'गाव तिथे वाचनालय', मुलींचे दत्तक पालकत्व, वृक्षारोपण व संगोपन चळवळ, साध्या विवाहाचा संकल्प, नेत्रदान व मरणोत्तर नेत्रदान यांसारखे विविध सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले आहेत.

## शेतकऱ्यांना पीकविमा द्या ; आ. खताळ आक्रमक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : संगमनेर तालुक्यात खरीप हंगाम २०२५ दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांसह फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या नुकसानीचे महसूल व कृषी विभागामार्फत पंचनामे करून शासनाकडे प्रस्तावही सादर करण्यात आले. मात्र, इतकी प्रक्रिया पूर्ण होऊनही तालुक्यातील अनेक पात्र शेतकऱ्यांना अद्याप पीकविमा नुकसान भरपाई मिळालेली नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. याबाबत आमदार अमोल खताळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे पूर्वीच पत्राद्वारे पाठपुरावा केला असल्याची माहिती त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून दिली आहे. आ. खताळ यांनी म्हटले आहे की, अहिल्यानगर जिल्ह्यातील काही तालुक्यांना नुकसान भरपाई व पीकविमा अनुदान मंजूर करण्यात आले असून अनेक तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये विमा रक्कम जमा झाली आहे. मात्र, संगमनेर तालुक्यातील शेतकरी अद्यापही विमा रकमेपासून वंचित आहेत. संबंधित शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची हलगर्जी, दिरंगाई आणि उदासीनता यामुळेच ही परिस्थिती निर्माण झाल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. यामुळे आधीच नैसर्गिक संकटामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना आणखी मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत आहे. शासनाने या प्रकरणाची तत्काळ दखल घेऊन दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी, तसेच संगमनेर तालुक्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात तातडीने पीकविमा रक्कम जमा करण्यासाठी संबंधित विभागांना स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणी आमदार खताळ यांनी केली आहे. दरम्यान, पीकविमा प्रश्नावर काहीजण राजकारण करत असल्याचा आरोप करत त्यांनी विरोधकांवरही अप्रत्यक्ष निशाणा साधला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आपण सातत्याने आवाज उठवत आलो असून, शेतकऱ्यांच्या न्यायासाठी लढा सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान समितीची उंदीरगावला भेट




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**उंदीरगाव** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत गावची पाहणी करिता राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीने उंदीरगाव येथे भेट देऊन विकास कामाची पाहणी केली. अशोक कारखान्याचे संचालक वीरेश गलांडे पाटील, सुरेश पाटील गलांडे,ग्रामसेवक आसने, सरपंच गोलवड यांनी समितीच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. समितीने संत तेरेसा चर्च, मुलांचे व मुलींचे विद्यालय येथे भेट देऊन पाहणी करून माहिती घेतली. या वेळी त्यांचे स्वागत प्रमुख धर्मगुरू फा. डॉमिनिक रोजारिओ व फा. फ्रान्सिस ओहोळ यांनी स्वागत केले. फिलिप पंडित यांनी परिसराची माहिती दिली. त्यानंतर समितीने प्राथमिक आरोग्य केंद्र,जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडीची पाहणी केली. गावातील विविध योजनाची माहिती घेऊन समाधान व्यक्त केले. समितीमध्ये पाटोदा जिल्हा बीड पंचायत समिती चे गट विकास अधिकारी उद्धव सानप, विस्तार अधिकारी पंचायत समिती बापुराव राख, उद्धव नेटके विस्तार अधिकारी कृषी, संतोष खटाने उप अभियंता, अर्शद शेख सहायक अभियंता यांच्या सह यांचा सह श्रीरामपूर पंचायत समिती चे अशोक खेडेकर,दीपक मेहरे यांचा समावेश होता. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.राजगुरू, उपसरपंच शेख, ग्राम पंचायत सदस्य ज्ञानेश्वर बांद्रे, रमेश पंडित, सुभाष पंडित,राजू गिऱ्हे,सुधीर ताके,नवनाथ नाईक,अब्बास शेख,सुभाष शिंदे,शोएब शेख,संजय काळे ,दीपक बोधक,उमेश दिवे,पांडुरंग राऊत,रोहित सोमवंशी,यांच्या सह आरोग्य सेविका,जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक,अंगणवाडी व आशा सेविका आदी उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस विशेषतः शिर्डी परिसरातील जनतेस कळविन्यात येते की, आमचे अशिल सौ. निर्मला शिवरुद्र मुरगे व शिवरुद्र महालिंग मुरगे यांची मौजे शिर्डी येथील स.न.१२१/२ ब/१ क पैकी क्षेत्र-७८६ चौ.मी. यांचे कायम खरेदीखत राहाता येथिल दु.नि.का. रजी. दस्त नं १२५७/२००१ हा दि.१८/५/२००१ ला नोंदवलेला असुन दुसरा दस्त साकुरी येथील गट नं १२१/१० क्षेत्र १२१६.३४ चौ.मी. यातील ई ब्लॉक दुस-या मजल्यावरील सदनिका रजी. दस्त नं-३०२६/२०१२ हा दि. २०/६/२०१२ ला नोंदलेला आहे. सदर मुळ दस्त मुळ मालकाकडुन परीसरात हरवले असुन ते शोध घेऊनही सापडलेले नाहीत. सदर दस्त कुनाला सापडलेस तात्काळपणे चार दिवसात खाली दिलेल्या पत्यावर आनुन द्यावी,

ही जाहीर नोटीस.
दि. १०.५.२०२६.

**ॲड.बी.ए.हुसळे.**
**नोटरी पब्लीक, महाराष्ट्र शासन.**
**राहाता, छत्रपती कॅम्लेक्स जि. अहमदनगर.**
**मो.९८५००४४००८.**

## श्रीरामपुरात 'गुरखा' देणार आपत्कालीन सेवा

### नगरपालिकेत नवीन अग्निशमन वाहन दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : येथील नगरपालिकेला राज्य शासनाकडून नव्याने गुरखा अग्निशमन वाहन मिळाले आहे. नगराध्यक्ष करण ससाणे आणि पदाधिकाऱ्यानी नवीन वाहनाची विधियुक्त पूजा करण्यात आली.



यावेळी नगराध्यक्ष करण ससाणे म्हणाले की, शहरातील आपत्कालीन परिस्थितीत नवीन गुरखा अग्निशमन वाहन उपयुक्त ठरणार आहे. विशेष करून हे वाहन गल्लीबोळातही सहज पोहचू शकेल निश्चितच येणाऱ्या काळात या वाहनाचा चांगला उपयोग होईल असे म्हटले.

जिल्हाध्यक्ष सचिन गुजर म्हणाले की, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदतकार्य मिळणे आवश्यक आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या नेतृत्वाखाली श्रीरामपूर नगरपरिषद कटीबद्ध असल्याचे सांगितले.

यावेळी जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, जेष्ठ नगरसेवक दिलीप नागरे, महिला बालकल्याण समितीच्या सभापती मंजूश्री मुरकुटे, दत्तात्रय सानप, आरोग्य समितीचे सभापती दीपक वमने, पाणी पुरवठा सभापती योगेश जाधव, नगरसेवक गोपाल लिंगायत, रितेश एडके, सुधीर वायखिंडे, सागर भागवत, पुंडलिक खरे, योगेश गायकवाड यांच्यासह पालिका कर्मचारी उपस्थित होते.

## राहाता शिर्डी जनगणना प्रशिक्षणाची सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : भारताची १६ वी आणि जगातील सर्वात मोठ्या पहिल्या डिजिटल जनगणना राहाता शिर्डी परिसरात प्रशिक्षणाची नुकतीच सांगता झाली.देश पातळीवरील सर्वात मोठ्या असलेल्या जनगणना प्रशिक्षणाची सुरुवात अहिल्यानगर जिल्ह्यात राहता शिर्डी परिसरात २६ एप्रिल ते ८ मे या कालावधीत शिर्डी संस्थानच्या निमगाव कोऱ्हाळे येथील साईबाबा संकुल महाविद्यालयात झाली.




हे जनगणना प्रशिक्षण राहाता तालुक्याचे तहसीलदार अमोल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली राहाता तालुका व राहाता, शिर्डी शहर परिसरासाठी घेण्यात आले. राहाता ग्रामीण प्रशिक्षणासाठी नायब तहसीलदार हेमंत पाटील आणि राहाता शहर प्रशिक्षणासाठी राहाता नगरपरिषदेचे मुख्याधिकारी वैभव लोंढे व शिर्डी शहरसाठी दिघे साहेब यांनी चार्ज अधिकारी म्हणून काम पाहिले.

जनगणने अंतर्गत १ ते १५ मे या कालावधीत सर्व नागरिकांनी आपल्या घरगणनेची स्वगणना करून घ्यायची आहे. तर १६ मे ते १४ जून या कालावधीत प्रगणकामार्फत या परिसरात प्रगणना होणार आहे. या कामासाठी एकूण ४१० घरयादी गट तयार करून यामध्ये ४५१ प्रशिक्षक आणि ७६ पर्यवेक्षकांमार्फत हे जनगणनेचे काम परिसरात पूर्ण केले जाणार आहे.

राहाता तालुक्याचे ग्रामीण जनगणनेचे चार्ज अधिकारी तहसीलदार अमोल मोरे व अतिरिक्त चार्ज अधिकारी निवासी नायब तहसीलदार हेमंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या प्रशिक्षणाची नुकतीच सांगता झाली. यावेळी प्रशिक्षणासाठी अरुण मोकळ, अनमोल होन, विजय देशमुख, अण्णासाहेब पडवळ, नानासाहेब राजभोज, प्राचार्य विकास शिवगजे, किरणकुमार अरगडे, सुरेखा जोगदंडकर यांनी क्षेत्रीय प्रशिक्षक म्हणून काम पाहिले.

यावेळी अतिरिक्त चार्ज अधिकारी निवासी नायब तहसीलदार हेमंत पाटील, मुख्याधिकारी वैभव लोंढे यांनी आपल्या मनोगतातून जनगणना यशस्वी करण्यासाठी प्रशिक्षकांना शुभेच्छा दिल्या. तर डॉ. शरद दुधाट यांनी जनगणना प्रशिक्षणाचे अनुभव व्यक्त केले. हे प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी गणेश साबळे, महेश कालेकर, प्रमोद घाणे, कृष्णा पोटे यांचे विशेष सहकार्य लाभले. सूत्रसंचालन अनमोल होन यांनी केले.

# संजीवनीच्या ५३ विद्यार्थ्यांची अद्विक हाय-टेक कंपनीत नोकरीसाठी निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगांव:** संजीवनी के.बी. पी.पॉलीटेक्निकच्या एकाचवेळी त्रेपन्न विद्यार्थ्यांची अद्विक हाय-टेक कंपनीत नोकरीसाठी निवड झाली. वयाच्या अवघ्या एकोणावीसाव्या वर्षी हे सर्व विद्यार्थी कमावते झाले. त्यामुळे पालक सुखावले आणि विध्यार्थ्यांच्या करिअरला देखील चांगल्या पध्दतीने सुरवात झाली. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट (टी अँड पी) विभाग विद्यार्थ्यांवर मेहनत घेतो. त्याचवेळी औद्योगिक जगतासोबत संपर्क ठेवतो, त्याचे हे फलीत आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही चांगल्या कंपनीत चांगल्या पगाराची नोकरी हे समिकरण सार्थ ठरते आहे. या सर्व विध्यार्थ्यांना या कंपनीने आकर्षक पॅकेज दिले आहे.

या कंपनीने निवड केलेल्या विद्यार्थ्यांत मेकॅट्रॉनिक्स विभागाच्या २३ विद्यार्थ्यांमध्ये कृष्णा अष्टेकर, संकेत भरड, श्रध्दा डेंगळे, लकी फाटके, रोहीत गटकल, अंकिता जमधडे, सर्वज्ञ जोशी, कुणाल कोळपे, महेश भालेराव, तनिष्का म्हैस, मुकेश शर्मा, दिशा नेहे, साक्षी पठारे, प्राची कोल्हे, प्रणव इखे, प्रणव तुपे, शुभदा शेलार, अथर्व सोनवणे, तेजश्री जेजुरकर, गौरव तिवारी, विशेष पानगव्हाणे, शशांक वावरे व संस्कार दळवी यांचा समावेश आहे. इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या ३० विद्यार्थ्यांची निवड झाली. यात वैभव शिंदे, श्रध्दा अहिरे, अभिषेक कुमार, माधव कताडे, कार्तिक लांडे, शाम बेलदार,उत्कर्षा देवकर, अंकिता खंडागळे, भाग्येश लोडे, मणिश वैद्य, अविनाश रानोडे, सार्थक लोंढे, शुभम शिंदे, तनवी दवंगे, प्रज्ञा फोपसे, मानसी म्हैस, युवराज पिंपरकर, खुशी



शेजवळ , अनुराज सोळस, आदित्य ठुबे, सौरभ सिनगर, तनवी गिते, प्रतिक वाकचैरे, अबनिश कुमार, अनुराधा साळुंके, साक्षी पोपळघट, प्रतिक्षा म्हस्के, उमेश गायकवाड, बाळासाहेब इथापे व मोहम्मद समिर अलि यांचा समावेश आहे.

संस्थेचे अध्यक्ष नितिन कोल्हे आणि कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य ए. आर. मिरीकर आदी उपस्थित होते.

## दिवे परिसरात हिरव्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**दिवे :** दिवे परिसरात शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जात असून दिवसेंदिवस अनेक शेतकरी दूध उत्पादनाकडे वळत आहेत. मात्र, बदलते हवामान, अपुरा पाऊस आणि वाढती चारा टंचाई यामुळे दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांसमोर हिरव्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. या पार्श्वभूमीवर परिसरातील शेतकऱ्यांचा मुरघास तयार करण्याकडे मोठ्या प्रमाणात कल वाढताना दिसून येत आहे. मका, ज्वारी तसेच विविध हिरव्या चाऱ्यांपासून तयार करण्यात येणारा मुरघास हा जनावरांसाठी पौष्टिक व दीर्घकाळ टिकणारा खाद्य पर्याय मानला जातो. हिरवा चारा मुबलक प्रमाणात उपलब्ध असताना तो विशेष पद्धतीने साठवून ठेवला जातो. त्यानंतर उन्हाळा किंवा दुष्काळी



परिस्थितीत चाऱ्याची टंचाई निर्माण झाल्यास याच मुरघासाचा उपयोग केला जातो. त्यामुळे जनावरांना वर्षभर नियमित व सकस चारा उपलब्ध होण्यास मदत होत आहे. दुग्ध व्यवसाय करणाऱ्या अनेक शेतकऱ्यांनी मुरघासामुळे दुधाच्या उत्पादनात वाढ झाल्याचे सांगितले. तसेच बाजारातून महागड्या पशुखाद्याची खरेदी करण्याचा खर्चही कमी होत असल्याने आर्थिक बचत होत आहे. परिणामी, अल्पभूधारक शेतकरीदेखील मुरघास निर्मितीकडे वळताना दिसत आहेत. परिसरातील काही शेतकऱ्यांनी मुरघास निर्मिती हा व्यवसायिक दृष्टिकोनातून स्वीकारला असून व्यावसायिक तत्त्वावर मुरघासाची विक्री सुरू केली आहे. सध्या मुरघासाला मोठी मागणी असून सुमारे सात रुपये किलो दराने विक्री होत आहे. यामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत असून युवकही या व्यवसायाकडे आकर्षित होत आहेत. कृषी तज्ज्ञांच्या मते, मुरघासामुळे चाऱ्याचा अपव्यय कमी होतो तसेच जनावरांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. त्यामुळे भविष्यात दुग्ध व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी मुरघास निर्मिती हा प्रभावी पर्याय ठरत असल्याचे चित्र दिवे परिसरात पाहायला मिळत आहे...... फोटो ओळ.... दिवे ता. पुरंधर येथे मुरघास तयार करताना शेतकरी प्रदीप झेंडे व प्रियांका झेंडे

## हिवरे कुंभारमध्ये एकाच पिंजऱ्यात दोन बिबटे जेरबंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे :** शिरुर तालुक्यात बिबटे पकडून माणिकडोह बिबट निवारा केंद्रात दाखल करण्यात येत असताना वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात एकाच वेळी दोन बिबटे जेरबंद झाल्याची दुर्मिळ अशी घटना घडली आहे.

हिवरे कुंभार (ता. शिरुर) सह पिंपळे खालसा परिसरात वारंवार बिबट्याचे दर्शन होऊन काही पाळीव प्राण्यांवर बिबट्याने हल्ले केले असताना नुकतेच वनविभागाच्या वतीने हिवरे कुंभार व पिंपळे खालसा गावच्या सीमेवर स्वप्नील धुमाळ यांच्या घराजवळ वनविभागाच्या वतीने पिंजरा लावण्यात आलेला होते, आज सकाळच्या सुमारास सदर पिंजऱ्यात दोन बिबटे अडकले असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांना मिळताच नियतक्षेत्र वनअधिकारी सोपान अनासुने, वन्यजीव बचाव पथकाचे शेरखान शेख, गणेश टिळेकर, अमोल कुसाळकर, परमेश्वर दासरे यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली असता शिरुर तालुक्यात प्रथमच एकाच वेळी पिंजऱ्यात अडकल्याचे दिसून आले, यावेळी सदर पथकाने स्वप्नील धुमाळ, खंडू धुमाळ, पांडुरंग धुमाळ, दादा गोडसे, मारुती सुरशे, तानाजी धुमाळ, बापू दरेकर, महेश धुमाळ, कैलास धुमाळ, सागर धुमाळ, संदीप सुरशे, बुवासाहेब धुमाळ यांच्या उपस्थितीत दोन्ही बिबट्यांना ताब्यात घेतले, तर एकाच पिंजऱ्यात अडकलेल्या दोन्ही बिबट्यांची रवानगी माणिकडोह बिबट निवारा केंद्रात दाखल करण्यात आल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी सांगितले.

हिवरे कुंभार येथे एकाच पिंजऱ्यात दोन बिबटे अडकल्याची घटना दुर्मिळ असून मादी व बछडा एकाच वेळी पिंजऱ्यात गेल्याने अडकले असावे तसेच हि घटना शिरुर तालुक्यात प्रथमच घडली असल्याचे नियतक्षेत्र वनअधिकारी सोपान अनासुने यांनी सांगितले.



## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातून प्रश्न सोडवा : आ. विवेक कोल्हे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव, :** शासनाच्या वतीने कोपरगाव मतदारसंघात आयोजित करण्यात आलेले 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' विविध ठिकाणी राबविण्यात येणार असून, नागरिकांच्या दैनंदिन महसुली अडचणी तत्काळ सोडविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना एकाच ठिकाणी महसूल विभागाशी संबंधित विविध सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या अभियानांतर्गत सोमवार, दि. ११ मे रोजी सकाळी ९ वाजता दहेगाव बोलका येथील हनुमान मंदिर शेजारील सभागृहात शिबिर होणार आहे. त्यानंतर सकाळी १० वाजता पोहेगाव येथील वक्रतुंड मंगल कार्यालयात अभियान राबविण्यात येणार आहे. तसेच दि. १५ मे रोजी कोपरगाव शहरातील कलश मंगल कार्यालय येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दहेगाव बोलका महसूल मंडळातील सर्व गावे, पोहेगाव महसूल मंडळातील सर्व गावे तसेच कोपरगाव शहर आणि कोपरगाव महसूल मंडळ कार्यक्षेत्रातील नागरिकांनी या अभियानात उपस्थित राहून आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी केले आहे. या अभियानात सातबारा उतारा, फेरफार नोंदी, उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्र, निवासी दाखले, वारस नोंद, जमीन मोजणी, ई-पीक पाहणी, नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई संदर्भातील प्रश्न तसेच



इतर महसुली कामांबाबत मार्गदर्शन व तातडीने कार्यवाही केली जाणार आहे. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे. महाराजस्व अभियानामुळे नागरिकांना महसूल कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागणार नाहीत. गावपातळीवरच सेवा उपलब्ध होत असल्याने सामान्य नागरिक, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक तसेच विद्यार्थी वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे. प्रशासन आणि जनतेमधील समन्वय अधिक मजबूत करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे. या शिबिरात महसूल विभागासह संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या विविध प्रश्नांचे समाधान करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नराधम कांबळेला फाशीची द्या ; रिपब्लिकन सेनेची मागणी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** पुणे जिल्ह्यातील नरसापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची निघृण हत्या करणाऱ्या आरोपीस फाशी द्या, अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्यावतीने निवेदनाव्दारे करण्यात आली आहे. श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे. की, पुणे जिल्ह्यातील नरसापूर येथील चिमुरडीवर नराधम भीमराव कांबळे याने अत्याचार करून तिची निघृण हत्या केली. ही घटना माणुसकीला काळीमा फासणारी आहे. त्याच्यावर कडक कारवाई करून त्याला चौकात फाशी देण्यात यावी, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी रिपब्लिकन सेनेचे शिवा साठे, प्रवीण साळवे, नवनाथ गुडेकर, दादासाहेब बनकर, सुरेंद्र रुपटके, चांगदेव लोखंडे, आरिफ शेख, सुरेश पवार, रवी पारखे, सुमेध पडवळ, बाबा शेख, यश काळे, राजू गायकवाड, सलीम शेख, सुरेंद्र रजपूत, महिला आघाडीच्या दर्शना काळे, श्रीरामपूर तालुकाप्रमुख सना पठाण, आरती जाधव, शितल सोरने, वर्षा त्रिभुवन, अलका शेलार उपस्थित होते.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान समितीची उंदीरगावला भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**उंदीरगाव -** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत गावची पाहणी करिता राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीने उंदीरगाव येथे भेट देऊन विकास कामाची पाहणी केली. अशोक कारखान्याचे संचालक वीरेश गलांडे पाटील, सुरेश पाटील गलांडे,ग्रामसेवक आसने, सरपंच गोलवड यांनी समितीच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. समितीने संत तेरेसा चर्च, मुलांचे व मुलींचे विद्यालय येथे भेट देऊन पाहणी करून माहिती घेतली. या वेळी त्यांचे स्वागत प्रमुख धर्मगुरू फा. डॉमिनिक रोजारिओ व फा. फ्रान्सिस ओहोळ यांनी स्वागत केले. फिलिप पंडित यांनी परिसराची माहिती दिली. त्यानंतर समितीने प्राथमिक आरोग्य केंद्र,जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडीची पाहणी केली. गावातील विविध योजनाची माहिती घेऊन समाधान व्यक्त केले. समितीमध्ये पाटोदा जिल्हा बीड पंचायत समिती चे गट विकास अधिकारी उद्धव सानप, विस्तार अधिकारी पंचायत समिती बापुराव राख, उद्धव नेटके विस्तार अधिकारी कृषी, संतोष खटाने उप अभियंता, अर्शद शेख सहायक अभियंता यांच्या सह यांचा सह श्रीरामपूर पंचायत समिती चे अशोक खेडेकर,दीपक मेहरे यांचा समावेश होता. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.राजगुरू, उपसरपंच शेख, ग्राम पंचायत सदस्य ज्ञानेश्वर बांद्रे, रमेश पंडित, सुभाष पंडित,राजू गिऱ्हे,सुधीर ताके,नवनाथ नाईक,अब्बास शेख,सुभाष शिंदे,शोएब शेख,संजय काळे ,दीपक बोधक,उमेश दिवे,पांडुरंग राऊत,रोहित सोमवंशी,यांच्या सह आरोग्य सेविका,जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक,अंगणवाडी व आशा सेविका आदी उपस्थित होते.



**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME
MOMIN GANI SHAIKH
EDUCATION DOCUMENT
(BEFORE NAME)
TO NEW NAME AS
MOBIN GANI SHAIKH
(AADHAR CARD NO. 7446 9826 1706 )
(AFTER NAME)
FROM VIDE AFFIDAVIT BEFORE
NOTARY PUBLIC KOPARGAON
PLACE- KOPARGAON
DATE- 10/05/2026

## टाकळीभान कारेगाव रोडच्या कामातील रोड वरील पुलाचे काम व्हावे : मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान:** माजी आ. लहू कानडे यांच्या प्रयत्नातून मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत टाकळीभान ते कारेगाव रस्त्याचे काम झाले आहे. या रोडवरील कापसे व पवार यांच्या क्षेत्राजवळील रस्त्यावरील पुलाचे काम होणे बाकी आहे. ते काम व्हावे अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. रस्ता व्यवस्थित झाला असताना वाहने रोडवर सुसाट असतात. परंतु कापसे व पवार क्षेत्राजवळी रस्त्यावरील फुलाचे काम तेवढ्या जागेत न झाल्याने वाहन चालक यांना त्याचा अंदाज न आल्याने वाहनाचा ताबा सुटून त्या ठिकाणी पडत आहेत. जेणेकरून त्या ठिकाणी अपघात होणार नाहीत त्यामुळे या रस्त्यावरील त्या पुलाचे काम व्हावे अशी मागणी येथील रोड परिसरातील लाभधारक नागरिकांनी केली आहे.

## निधन वार्ता

### दिलीप अंचवले



**एरंडगाव :** अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकार शेवगाव येथील मार्केट यार्ड शाखेचे शाखाधिकारी दिलीप दिनकर अंचवले (वय ५७) यांना शुक्रवारी सायंकाळी ४ चे दरम्यान बँकेत काम करत असताना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. बँकेच्या सहकार्यांनी धावपळ करून तातडीने स्थानिक रुग्णालयात नेले. मात्र डॉक्टरांनी त्यांचे निधन झाल्याचे जाहीर केले. ते प्रसिद्ध भागवताचार्य दिनकर महाराज अंचवले यांचे ते ज्येष्ठ पुत्र होते. सन १९९१ पासून ते जिल्हा सहकारी बँकेत कार्यरत होते. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, पत्नी, वडील असा परिवार आहे.

### लक्ष्मीबाई राजळे



**शहरटाकळी-** शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी येथील जुन्या पिढीतील लक्ष्मीबाई भानुदास राजळे ( वय ८३) यांचे नुकतेच वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पाश्चात्य दोन विवाहीत मुले ,सुना नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार असून शहरटाकळी चे माजी उपसरपंच भाऊसाहेब राजळे व प्रगतशील शेतकरी कैलास राजळे यांच्या त्या आई होत्या.

### हभप. सिताराम वाणी



**झरेकाठी :** येथील हभप. सिताराम शंकर वाणी (वय ७०) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलं , एक मुलगी,बहीण, जावई सून नातवंड असा परिवार आहे . बडोदा गुजरात येथील कंपनी मधील प्रोजेक्ट मॅनेजर रमेश सिताराम वाणी व रोहा रायगड येथील ग्रेगोरियन पब्लिक स्कूल ग्रंथपाल प्राध्यापक ज्ञानेश्वर सिताराम वाणी, नंदा उर्फ वैशाली मोरगे यांचे ते वडील होते. तसेच पत्रकार सोमनाथ डोळे यांचे ते आत्या भाऊ होत.

### जनार्धन वहाडणे



**पुणतांबा :** परिसरातील राष्ट्रीय स्वयंसेवक जेष्ठ सदस्य श्री जनार्धन विठोबा वहाडणे (वय ९४ ) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे तीन मुले व मुलगी असा परिवार आहे. भारत , सुनिल, व जगदीश वहाडणे यांचे ते वडील होत.

# निराधार व श्रावणबाळ योजनेची प्रलंबित प्रकरणे निकाली काढा : आ. विवेक कोल्हे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** संजय गांधी निराधार योजना तसेच श्रावणबाळ योजनेअंतर्गत तब्बल ५४२ प्रकरणे पात्र-अपात्र निवडीसाठी तहसील कार्यालयात प्रलंबित असून, संबंधित लाभार्थी निर्णयाच्या प्रतीक्षेत आहेत. ही प्रकरणे तातडीने मार्गी लावावीत, अशी सूचना आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी तहसील प्रशासनाला केली आहे. आमदार कोल्हे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, कोपरगाव तालुक्यात संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेचे एकूण ११ हजार ९९५ लाभार्थी आहेत. मात्र या योजनांशी संबंधित प्रस्तावांवर वेळेवर बैठका होत नसल्याने तब्बल ५४२ प्रस्ताव प्रलंबित राहिले आहेत. या हलगर्जीपणामुळे गरजू नागरिकांचे आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप त्यांनी केला. तालुक्यातील ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात लाभार्थी या योजनांचा लाभ घेण्यासाठी तहसील कार्यालयात येत असतात. मात्र त्यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास येत आहे. विशेषतः वयोवृद्ध, महिला व निराधार लाभार्थ्यांना वारंवार तहसील कार्यालयाचे हेलपाटे मारावे लागत असून, गोरगरीबांच्या प्रस्तावांकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना लाभार्थ्यांमध्ये निर्माण झाली आहे. ज्यांच्याकडे जबाबदारी होती त्या लोकप्रतिनिधींनी ती वेळेत पार पाडणे अपेक्षित होते. मात्र तसे न झाल्यामुळे अनेक दिवस नागरिकांना बैठकीच्या प्रतीक्षेत राहावे लागल्याचेही त्यांनी नमूद केले. काही वेळा संबंधित अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याच्या तक्रारी असून, कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी किचकट अटी लादल्या जात असल्याने सर्वसामान्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे पूर्ण करूनही प्रस्तावांवर बैठका होत नसल्याने आणि याद्या जाहीर न केल्याने स्थानिक पातळीवरील दुर्लक्षामुळे नाराजीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे कोल्हे यांनी म्हटले आहे. याशिवाय, कोपरगाव पंचायत समितीमार्फत छत्रपती राजर्षी शाहू महाराज वृद्ध कलावंत योजनेअंतर्गत ४४ प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडे प्रलंबित असल्याचेही त्यांनी सांगितले. जिल्हा व तालुका स्तरावरून मोठ्या प्रमाणात वृद्ध कलावंतांचे प्रस्ताव पाठविले जात असतानाही त्यांना वेळेत मंजुरी मिळत नसल्याने या प्रश्नाकडे जिल्हाधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गरजू, निराधार व ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ वेळेत मिळण्यासाठी प्रशासनाने तत्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी केली आहे.

## जुन्या वादातील मध्यस्ती भोवली ; रिक्षाचालकास बेदम मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : गोटुंबे आखाडा येथील मागील काही दिवसापूर्वी झालेल्या जुन्या वादात मध्यस्ती केल्याच्या कारणावरुन आरोपींनी एका रिक्षा चालकास शिवीगाळ करुन लाकडी दांडा व लाथा बूक्क्यांनी मारहाण केल्याची घटना दिनांक ९ मे रोजी सायंकाळी राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी परिसरात घडली आहे. यापुर्वी संतोष जोगदंड व अजय गुंजाळ यांच्यात झालेल्या वादात बाळू दाभाडे यांनी मध्यस्ती केलेली होती. दिनांक ९ मे २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास बाळू दाभाडे हे त्यांची रिक्षा घेऊन राहुरीकडून सोनईकडे जात असताना ब्राम्हणी परिसरात आरोपींनी त्यांची मोटारसायकल रिक्षाला आडवी लावुन दाभाडे यांना अडवीले. आणि म्हणाले की, तुला जास्त झाले काय, असे म्हणून आरोपींनी बाळू दाभाडे यांना शिवीगाळ करुन लाकडी दांडा व लाथा बूक्क्यांनी मारहाण बेदम केली. तसेच तु जर पोलीस कम्पलेंट केली तर तुला आणखी जास्त मारील, अशी धमकी देवुन आरोपी तेथून निघुन गेले.

बाळु भगवान दाभाडे, वय ४२ वर्षे, राहणार गोटुंबे आखाडा तालुका राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी राहुल दिपक गुंजाळ, अजय दिपक गुंजाळ, रोहित दिपक गुंजाळ, संदिप तात्याबा बाचकर, सर्व राहणार गोटुंबे आखाडा, गुन्हा रजिस्टर नंबर ४८५/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ११८ (१), १२६ (२), ३५१ (२), ३५२, ३ (५) प्रमाणे मारहाण व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक निकम हे करत आहेत.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

सोमवार दि .११ मे २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत
१९० १४५ ११८ — ०-४ — १५८ २४८ ४८६
जोड ०५-१४-३९ ७६-४८

**कल्याण**
उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत
१२९ ४८० ६६० — २-५ — १४० १५३ ११३
जोड २६-८५-६३-९०-५४

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत
१३० १४९ ४०० — ४-७ — १२४ १७९ १६०
जोड ४१-३७-५८-०२-७९

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to [redacted] | 56[redacted] 06 15[redacted] | 14[redacted] 43 67[redacted] | 23[redacted] 45 50[redacted] | 13[redacted] 77 89[redacted] | 26[redacted] 85 14[redacted] |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |

द • ख • ल

## श्री समर्थ विद्या मंदिर सांगळे गल्ली शाळेच्या निकाल ९३. ८१ टक्के

**अहिल्यानगर** : येथील श्री समर्थ विद्या मंदिर माध्यमिक विभाग, सांगळे गल्ली या विद्यालयाने सन २०२५-२६ च्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत ९३.८१ टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाच्या या यशामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षात विद्यालयातून एकूण ९७ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ९१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विशेष म्हणजे २० विद्यार्थ्यांनी डिस्टिंक्शन प्राप्त करत आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटविला. तसेच ४१ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, २६ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी तर ४ विद्यार्थ्यांनी पास क्लासमध्ये यश मिळविले. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. श्रेया प्रफुल्ल दांगट हिने ९०.६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला. कु. साईशा अभिजीत मालवंडे हिने ८७ टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक संपादन केला. तर कु. मुग्धा विजय धात्रक आणि सारंग अनिल जोशी यांनी प्रत्येकी ८६ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला .या विद्यार्थ्यांच्या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यालयाच्या या यशामागे शिक्षकांचे नियोजनबद्ध अध्यापन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना नियमित मार्गदर्शन, सराव परीक्षा, शंका निरसन उपक्रम आणि अभ्यासाचे प्रभावी नियोजन यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढून उत्कृष्ट निकाल साध्य झाला. या यशाबद्दल श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ, अहिल्यानगर येथील सर्व पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे अभिनंदन केले. संस्थेचे कार्यकारीणी सदस्य तथा शालेय समिती चेअरमन स्वप्निल कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली विद्यालयाने गुणवत्ता वृद्धीचे अनेक उपक्रम राबविले.

## गुन्हेगारीच्या समुळ उच्चाटनासाठी
# एसपींची 'ब्लॅक स्पॉट' कारवाई

किरण बोरुडे । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर : अहिल्यानगर डॅशिंग पोलीस अधिकारी म्हणून सुपरिचित असणारे जिल्ह्याचे नवे एस. पी. मुम्मका सुदर्शन यांनी पदभार स्वीकारतात धडाकेबाज कामगिरीला सुरुवात केली आहे. गुन्हेगारीच्या समुळ उच्चाटनासाठी 'ब्लॅक स्पॉट' कारवाईला प्रारंभ केला आहे. तसे आदेश सुदर्शन यांनी सर्वच पोलीस ठाण्यांना दिले आहेत.**

या धडाकेबाज कामगिरीमुळे आतापर्यंत तोफखाना व कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुमारे ३० जणांना पकडून कारवाई करण्यात आली आहे. या धडाकेबाज कारवाईमुळे यापुढे आडोशाला लपून छपून दारू, गांजा पिणाऱ्यांचे चांगले धाबे दणाणले आहेत. एस. पी. सुदर्शन यांच्या या धडाकेबाज कारवाईमुळे अवैध व्यवसायिकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. एस. पी. सुदर्शन यांनी आपल्या पदभार घेतात नगर शहरात स्टेशन रोडवर 'तिरट' नावाच्या जुगार अड्ड्यावर छापा टाकून सुमारे २९ जणांना अटक केली. तसेच मोठा ऐवजही जप्त करण्यात आला. त्या पाठोपाठ गुटखा बनवण्यासाठी लाल सुपारी घेऊन जाणाऱ्या दोन माल ट्रक पकडून धडक कारवाईची झलक दाखवली. आता त्याचप्रमाणे गुन्हेगारीचे समुळ उच्चाटनासाठी 'ब्लॅक स्पॉट' योजना आखली असून कारवाईला प्रारंभ केला आहे. रस्त्याच्या कडेला तसेच आडोशाला बसून दारू, गांजा, चरस, गर्द, बिंडा यांचे सेवन करून नशेच्या नादात गुन्हे करणाऱ्यांवर आता त्यांनी करडी नजर ठेवली आहे. या कारवाईत कोतवाली आणि तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुमारे ११ ठिकाणी छापे टाकून ३० नसेल्यांना अटक केली आहे. त्यांच्याविरुद्ध पोलीस ठाण्यात रीतसर गुन्हे दाखल केले आहेत. आता ही कारवाई सर्वच पोलीस ठाण्याच्या हद्दीत वेगाने करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे या गुन्ह्यांना अभय देणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना (कलेक्टर) चांगली तंबी दिल्याची पोलीस वर्तुळात चर्चा आहे. एसपी सुदर्शन यांच्या एका पाठोपाठ एक धडाकेबाज कारवायामुळे अवैध व्यवसायिकांचे धाबे दणाणले आहेत. याबरोबरच अवैध मटका, जुगार, गावठी दारू, हातभट्टी धंद्याकडेही हा मोर्चा वळविला जाणार असल्यामुळे अनेकांनी आपले बस्थान हलविण्यास सुरुवात केली आहे. अनेक ठिकाणी आडोशाला बसून सुरू असलेले अवैध धंदे हेच गुन्हेगारीचे मूळ स्रोत असल्याने एस.पी. सुदर्शन यांनी रात्रीच्या वेळी संशयास्पद फिरणाऱ्यांकडेही आपली वक्रदृष्टी केली आहे. रात्रीच्या पोलीस गस्त वाढवण्याच्या सूचना सर्वच पोलीस ठाण्यांचे प्रमुखांना देण्यात आल्या असून विनाकारण फिरणाऱ्यांवर आता वचक ठेवला जाणार असल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. चैन स्नॅकिंग, छेडछाड, हाणामाऱ्या यासाठी स्वतंत्र पथके तैनात करण्यात आली आहेत. एकूणच एस. पी. सुदर्शन यांच्या कारवाईची व्याप्ती आता वाढणार असून भुरट्या चोऱ्या, चैन स्नॅकिंग, हाणामाऱ्या यासह अवैध धंद्यांना आळा बसणार आहे. यासाठी नागरिकांनी काही संशयास्पद हालचाली आढळून आल्यास ११२ नंबरला डायल करून गोपनीय माहिती देण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## जिल्ह्यातून पाच सराईत गुन्हेगार हद्दपार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सराईत गुन्हेगारांविरूध्द कठोर पावले उचलत पाच जणांना जिल्ह्याच्या हद्दीतून हद्दपार करण्याची कारवाई केली आहे. अहिल्यानगर शहर पोलिसांनी पाठविलेल्या प्रस्तावर निर्णय घेत उपविभागीय दंडाधिकारी (अहिल्यानगर भाग) सुधीर पाटील यांनी संबंधित आदेश पारित केले आहेत.

शहरातील कोतवाली, तोफखाना आणि भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेल्या पाच सराईत गुन्हेगारांविरूध्द हद्दपारीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाची चौकशी करून शहर पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी अहवाल उपविभागीय दंडाधिकारी पाटील यांच्याकडे सादर केला होता. हद्दपार करण्यात आलेल्या गुन्हेगारांमध्ये अजित रामदास केकाण (वय २२, रा. संत भगवानबाबा चौक, सारसनगर), करण खंडू पाचारणे (वय ३१, रा. एमआयडीसी, नागापूर), गौरव प्रभाकर साळवे (वय ३०, रा. सिध्दार्थनगर), मंगेश अरूण थोरात (वय ३१, रा. यशोदानगर, पाईपलाईन रस्ता) आणि संग्राम रमेश गीते (वय २४, रा. केडगाव) यांचा समावेश आहे. यापैकी गौरव साळवे व संग्राम गीते यांच्यावर प्रत्येकी दोन वर्षांसाठी जिल्हाबंदीची कारवाई करण्यात आली आहे. तर अजित केकाण, करण पाचारणे आणि मंगेश थोरात यांना सहा महिन्यांसाठी अहिल्यानगर जिल्ह्याच्या हद्दीतून हद्दपार करण्यात आले आहे.

संबंधित सराईत गुन्हेगारांविरूध्द विविध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांच्या वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. उपअधीक्षक डॉ. टिपरसे, कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, तोफखान्याचे निरीक्षक जगदीश भांबळ, भिंगार कॅम्पचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर तसेच पोलीस अंमलदार महेश मगर, शिल्पा कांबळे, रेखा पुंड आणि हेमंत झिने यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

## प्रिमीयर लिगमध्ये जी.एन.एस नाईट रायडर्स विजेता

### सुपर किंग उपविजेता : कुशल पाटीलचे शतक, प्रेम इगेचा झंझावाती खेळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : अहिल्यानगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने व एस के क्रिकेट अकॅडमीच्या वतीने आयोजित सोळा वर्षाखालील अहिल्यानगर प्रीमियर लीगच्या दुसऱ्या वर्षातील अंतिम सामना अत्यंत अटीतटीचा झाला. जी एन एस नाईट रायडर्स आणि अहिल्यानगर सुपर किंग या दोन बलाढ्य संघांमध्ये झालेल्या या लढतीत अखेर सुपर ओव्हरमध्ये जी एन एस नाईट रायडर्स संघाने बाजी मारत विजेतेपद पटकावले, तर अहिल्यानगर सुपर किंग संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत जी एन एस नाईट रायडर्स संघाने २० षटकांत ४ बाद १९० धावांचे मोठे आव्हान उभे केले तर अहिल्यानगर सुपर किंग संघाने पाठलाग केला. कुशल पाटीलने अवघ्या ५९ चेंडूत १०५ धावांची तुफानी खेळी करत ८ चौकार व ६ षटकार ठोकले. त्याला राम खोमणेने ५८ धावांची साथ देत दोघांनी १६३ धावांची भक्कम भागीदारी उभी केली.

१९१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना अहिल्यानगर सुपर किंग संघानेही जोरदार लढत दिली. शेवटच्या षटकात विजयासाठी ११ धावांची गरज असताना सामन्याने रंगत घेतली. अखेरच्या दोन चेंडूत ७ धावांची गरज असताना फलंदाजाने षटकार मारत सामना बरोबरीत आणला. शेवटच्या चेंडूवर एक धाव हवी असताना मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात झेलबाद झाल्याने सामना सुपर ओव्हरमध्ये गेला.

सुपर ओव्हरमध्ये अहिल्यानगर सुपर किंग संघाची फलंदाजी पूर्णपणे कोलमडली. पहिल्याच चेंडूवर षटकाराच्या प्रयत्नात झेलबाद, तर दुसऱ्या चेंडूवर त्रिफळा उडाल्याने संघाला एकही धाव करता आली नाही. त्यामुळे जी एन एस नाईट रायडर्सला विजयासाठी केवळ एका धावाची गरज होती, जी त्यांनी दुसऱ्याच चेंडूवर चौकार मारत सहज पूर्ण केली आणि विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

या रोमांचक सामन्याचा थरार अनुभवण्यासाठी मोठ्या संख्येने प्रेक्षक उपस्थित होते.

## १७ व्या शब्दगंध साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी बनसोडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने येत्या २३ व २४ मे रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी अहिल्यानगर महानगरपालिकेचे नगरसेवक तथा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुरेश बनसोडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

आ. संग्रामभैय्या जगताप यांच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत ही निवड जाहीर करण्यात आली. यावेळी शब्दगंध चे अध्यक्ष राजेंद्र उदागे, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, संस्थापक, सचिव सुनील गोसावी, खजिनदार भगवान राऊत उपस्थित होते.

साहित्यिक प्रा.डॉ.संदीप सांगळे यांच्या अध्यक्षतेखाली जाधव लॉन्स, कल्याण रोड, अहिल्यानगर येथे हे संमेलन होणार आहे. सुरेश बनसोडे हे शिव,शाहू, फुले आंबेडकरी विचारांच्या चळवळीतील धडाडीचे कार्यकर्ते आहेत. आ. संग्रामभैय्या जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली माळीवाडा येथे उभारण्यात आलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या उभारणी कामी त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता.अनेक महापुरुषांच्या जयंती,पुण्यतिथी निमित्ताने विविध साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजना मध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो.

स्वागताध्यक्ष निवडीसाठी आयोजित बैठकीस शब्दगंध चे राज्य कार्यकारणी सदस्य सुभाष सोनवणे, प्रा. डॉ. तुकाराम गोंदकर, प्रा.डॉ. अनिल गर्जे, बबनराव गिरी, प्रशांत सूर्यवंशी, मकरंद घोडके, बाळासाहेब देशमुख, प्रा.हर्षल आगळे, प्रा. एल.बी.जाधव, शर्मिला गोसावी, स्वाती ठुबे,सुरेखा घोलप, विशाल तागड,दत्तू साळवे इ. उपस्थित होते.

या निवडीबद्दल सुरेश बनसोडे यांचा शब्दगंध चे कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे यांच्या हस्ते शाल,पुष्पगुच्छ, शब्दगंध स्मरणिका व ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला.

१७ वे शब्दगंध साहित्य संमेलन न भुतो न भविष्यती अश्या दिमाखदार पद्धतीने करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करील, सर्व मान्यवर व नवोदित साहित्यिकांना सहभागी करून घेऊन हे संमेलन यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.अशी ग्वाही सुरेश बनसोडे यांनी दिली.

यावेळी बैठकीचे प्रास्ताविक सुभाष सोनवणे यांनी केले. भगवान राऊत यांनी परिचय करून दिला. शेवटी प्रा. डॉ.अनिल गर्जे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहसचिव स्वाती ठुबे यांनी केले.

## पब्लिक स्कूल वाळुंज शाळेचा १००% निकाल

**अहिल्यानगर** : पब्लिक स्कूल वाळुंज शाळेचा या वर्षी देखील इयत्ता १० वी (एसएससी) बोर्डाचा निकाल १००% लागला आहे. शाळेने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा राखली आहे. शाळेच्या स्थापनेला २४ वर्षे पूर्ण होत असून, एसएससी बॅचच्या १४ व्या वर्षी उतरोत्तर शाळेची गुणवत्ता वाढत चालली आहे. विद्यालयाची विदयार्थीनी आदिती श्रीराम गोरे हिने ९०.२०% गुण मिळवून ती प्रथम आली आहे. विशेष प्रविण्य मध्ये ५ विद्यार्थी तर प्रथम श्रेणी मध्ये १० विद्यार्थी, द्वितीय श्रेणी मध्ये ४ विद्यार्थी तर तृतीय श्रेणी मध्ये १ विद्यार्थी अशी श्रेणी प्राप्त केली आहे. विशेष म्हणजे या विदयार्थ्यांनी कोणतीही बाहेरची शिकवणी न लावता स्वतः च्या अभ्यासावर आणि अनुभवी शिक्षकांच्या मार्गदर्शनावर यश मिळविले आहे. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कृषिभूषण सबाजीराव गायकवाड, संस्थेचे सचिव प्रशांत गायकवाड तसेच प्राचार्या, शिक्षकावृंद, पालक यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## हातगाडीवाल्या पित्याच्या कष्टाला मुलीच्या यशाची किनार ; जोया बागवानला ९९.२०%



**अहिल्यानगर** : शिक्षण घेऊन स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करण्याची मुलीची जिद्द आणि रस्त्यावर हातगाडी लावून संसाराचा गाडा ओढत मुलीला शिकविणाऱ्या बापाचे अथक कष्ट या संघर्षमय प्रवासाचे प्रेरणादायी फलित म्हणजे जोया सलीम बागवान हिचे घवघवीत यश होय. जोया बागवान हिने इयत्ता १० वी बोर्डाच्या परीक्षेत तब्बल ९९.२० टक्के गुणमिळवले. तिने अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये प्रथम येण्याचा मान मिळवला. जोयाच्या या यशाबद्दल कापड बाजार येथील हॉकर्स युनिटी असोसिएशनच्यावतीने तिचा तसेच तिचे वडील सलीम बागवान यांचा संघटनेचे अध्यक्ष साहेबान जहागीरदार यांनी सत्कार केला. याप्रसंगी झिया खान, गफ्फार शेख, फिरोज पठाण, नवीद शेख, नदीम शेख, अकबर अली शेख, अन्सार बिलाल पठाण, फय्याज शेख, मुजाहीद पठाण, यासिन पवार, राम परदेशी, बादल सांबरे, राजू पुरी, कमलेश जव्हेरी, सय्यद अशरफ, अविनाश देडगावकर, शेख शमशुद्दीन, शेख वसीम, शेख आवेज, सरफराज कुरेशी, हारुन शेख, शेख मतीन, शेख कादिर, नदीम शेख, अजित नागपुरे, ड. सफ्फान तांबटकर, शेख साजिद, शौकत पिंजारी, गफ्फार शेख उपस्थित होते. संघटनेचे सदस्य असलेले सलीम बागवान हे पथारी व्यावसायिक आहेत. मर्यादित उत्पन्न, घरातील आर्थिक अडचणी आणि संघर्षमय जीवन यांचा परिणाम मुलीच्या शिक्षणावर होऊ नये, यासाठी त्यांनी सातत्याने मेहनत घेतली. दुसरीकडे, जोयानेही त्या संघर्षाची जाणीव मनात ठेवत अभ्यासात सातत्य राखले. यावेळी साहेबान जहागीरदार म्हणाले की, परिस्थिती कितीही कठीण असली तरी, जर मनात जिद्द असेल तर यशाचे शिखर गाठता येते, हे जोया सलीम बागवान हिने सिद्ध करून दाखवले आहे. दहावीच्या परीक्षेत तिने मिळवलेले यश समाजातील प्रत्येक मुलीसाठी प्रेरणादायी आहे.

## ॲलेक्स कप गुलमोहर एफ.सी. ने पटकविला

### पार्थ मस्कर ठरला विजयाचा शिल्पकार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**अहिल्यानगर** : येथील भुईकोट किल्ला येथील मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या लेक्स कप फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात गुलमोहर एफसीने फिरोदिया शिवाजियन्स युनायटेड एफसीवर २-० गुणांनी विजेतेपद पटकावले. गुलमोहर एफसीकडून पार्थ मस्कर याने दोन्ही गोल करत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभासाठी अहमदनगर डिस्ट्रिक्ट फुटबॉल असोसिएशन, अहिल्यानगरचे मानद सचिव व स्व. लेक्स फर्नांडिस यांचे सुपुत्र रोनप फर्नांडिस, फुटबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष खालिद सय्यद, संयुक्त सचिव प्रदीप जाधव, कार्यकारिणी सदस्य व्हिक्टर जोसेफ, राजू पाटोळे, पल्लवी सैंदाणे आणि झोएब खान उपस्थित होते.

गुलमोहर एफ. सी. विरुध्द फिरोदिया शिवाजियन्स युनायटेड एफसी यांच्यात अत्यंत चुरशीचा झाला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच गुलमोहर एफसीने आक्रमक खेळी करत प्रतिस्पर्धी संघावर दबाव निर्माण केला. सामन्याच्या ७ व्या मिनिटाला पार्थ मस्कर याने शानदार गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर पुन्हा एकदा आक्रमक चाली रचत १२ व्या मिनिटाला दुसरा गोल झळकावून फिरोदिया शिवाजियन्स युनायटेड एफसीसमोर मोठे आव्हान उभे केले. दोन गोलने पिछाडीवर पडल्यानंतर फिरोदिया शिवाजियन्स संघाने पुनरागमनासाठी अनेक प्रयत्न केले. त्यांची एकही रणनीती यशस्वी ठरली नाही. पार्थ मस्करच्या दमदार दुहेरी गोलच्या जोरावर गुलमोहर एफसीने २-० असा दणदणीत विजय मिळवत प्रतिष्ठेचा ॲलेक्स कप आपल्या नावावर केला.

स्पर्धेच्या आयोजनासाठी फिरोदिया शिवाजियन्सचे सदस्य जेव्हिअर स्वामी, सचिन पात्रे, राजेश अँथनी आणि अभिषेक सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच वरिष्ठ खेळाडू अभय साळवे, मयूर गोरखा, साहिल कुसळकर, तसेच उत्कर्ष सोनवणे, नील धेंडवाल, जोएल पात्रे आणि इतर खेळाडूंच्या योगदानाचे क्लबतर्फे विशेष कौतुक करण्यात आले.

विजयी व उपविजयी ठरलेल्या संघांना उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते चषक व रोख बक्षिस देण्यात आले. यासह स्पर्धे तील सर्वोत्कृष्ट खेळाडू: नील धेंडवाल (फिरोदिया शिवाजियन्स युनायटेड), सर्वोत्कृष्ट गोलरक्षक: उनाध्य जाधव (गुलमोहर एफसी) यांना देखील सन्मानित करण्यात आले. अंतिम सामन्याचे पंच म्हणून जोनाथन जोसेफ, सुयोग महांगडे, ऋषभ मणी आणि प्रियांका अवारे यांनी काम पाहिले.

## भारतीय वनसेवेत सुशांत वडवकर यांची निवड



**श्रीगोंदा:** भारतीय वन सेवा ही देशातील अत्यंत प्रतिष्ठेच्या आणि मानाच्या तीन अखिल भारतीय सेवांपैकी एक सेवा असून उर्वरित दोन सेवा म्हणजे भारतीय प्रशासकीय सेवा आणि भारतीय पोलीस सेवा आहे या सेवेची परीक्षा केंद्रीय लोकसेवा आयोग मार्फत घेतली जाते.

देशातील जंगलांचे संवर्धन, वन्यजीवांचे संरक्षण, जैवविविधतेचे जतन, पर्यावरणीय सुरक्षा तसेच हवामान बदलाशी संबंधित धोरणांची अंमलबजावणी ही या सेवेतील अधिकाऱ्यांची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी असते. त्यामुळे भारतीय वन सेवा ही केवळ नोकरी नसून देशाच्या नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण करण्याचे मोठे राष्ट्रीय कर्तव्य मानले जाते.देशातील सर्वात कठीण आणि स्पर्धात्मक परीक्षांपैकी एक असलेल्या णझडउ परीक्षेत दरवर्षी लाखो उमेदवार सहभागी होतात; मात्र त्यापैकी अत्यंत कमी उमेदवार अंतिम निवडीपर्यंत पोहोचतात. अशा कठीण स्पर्धे त अखिल भारतीय स्तरावर ३१ वा क्रमांक मिळवत श्रीगोंद्याच्या सुशांत वडवकर यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या यशामुळे श्रीगोंदा शहराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. सुशांत वडवकर यांनी आपल्या यशाचे श्रेय वडील डॉ. उत्तम वडवकर आणि आई सुनीता वडवकर यांना दिले आहे. आई-वडिलांचे मार्गदर्शन, आशीर्वाद आणि सातत्यपूर्ण पाठबळ यामुळेच हे यश शक्य झाले, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

## फिनिक्स फौंडेशनतर्फे आयोजित शिबिरात महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### महिलांच्या नेत्र तपासणीने मातृत्व दिवस साजरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : मातृत्व दिनाचे औचित्य साधत फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नागरदेवळे (ता. नगर) येथे महिलांसाठी मोफत नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजातील ज्येष्ठ महिला, गरजू नागरिकांचा या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर परिसरात आयोजित या शिबिरात नेत्रदान व अवयवदानाबाबत जनजागृती करण्यात आली. अनेक महिलांनी यावेळी नेत्रदान व अवयवदानाचा संकल्प करत सामाजिक बांधिलकीची जाणीव व्यक्त केली. या शिबिराचे उद्घाटन उपस्थित महिलांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, बुधराणी हॉस्पिटलचे विशाल भिंगारदिवे, ग्रामस्थ, महिला व फिनिक्सचे पदाधिकारी उपस्थित होते.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे म्हणाले की, मातृत्वाचे ऋण कोणत्याही स्वरूपात फेडता येत नाही. आई आपल्या मुलांसाठी आयुष्यभर त्याग, प्रेम आणि संघर्ष करत असते. तिचे उपकार अनंत असतात. मातृत्व दिन हा केवळ शुभेच्छांचा दिवस नसून, आईच्या आरोग्याची काळजी घेण्याचा आणि तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. समाजातील अनेक माता आणि ज्येष्ठ महिला स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. ग्रामीण भागातील अनेक महिलांना योग्य आरोग्यसेवा वेळेत मिळत नाही. अशा महिलांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा प्रयत्न फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून सातत्याने केला जात आहे. माध्यमातून अनेक दृष्टीहीन व्यक्तींना नवदृष्टी मिळाली आहे.

शिबिरात तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत एकूण २७० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर ४७ रुग्णांवर पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये मोफत मोतीबिंदू व काचबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे .याशिवाय ज्येष्ठ नागरिकांची रक्तदाब, मधुमेह तसेच इतर आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. गरजू रुग्णांना अल्पदरात चष्म्यांचे वाटप करून आरोग्यविषयक मार्गदर्शनही करण्यात आले.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी गौरव बोरुडे, सौरभ बोरुडे, राजेंद्र बोरुडे, ओम बोरुडे, बुधराणी हॉस्पिटलचे सचिन पगार तसेच फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

द•ख•ल

## सोमेश्वर विद्यालयाचा निकाल ९८.३२ टक्के



सोमेश्वरनगर: दहावीत पुन्हा मुलींची बाजी, प्रथम क्रमांकावर समीरा संतोष शेंडकर. गणित विषयात १०० पैकी ९९ गुण मिळवत राज्यात बोर्डात द्वितीय क्रमांकाची मानकरी समीरा शेंडकर.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेतलेल्या दहावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून यंदाच्या निकालात पुन्हा एकदा मुलींनी बाजी मारल्याचे चित्र आहे. बारामती तालुक्यातील श्री सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे सोमेश्वर विद्यालयाचा एस. एस .सी. परीक्षा मार्च २०२६ निकाल परीक्षेस बसलेले एकूण विद्यार्थी २३८ पैकी २३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेचा निकाल ९८.३२ टक्के लागला आहे.विद्यालयातील प्रथम तीन गुणवंत विद्यार्थी समिरा संतोष शेंडकर ४७७/५०० - ९५.४०% प्रथम क्रमांक, सिद्धी संजय अलगुडे ४७५/५०० - ९५.००% द्वितीय क्रमांक , राजलक्ष्मी अशोक लकडे ४७०/५०० - ९४.००% तृतीय क्रमांक तसेच मुलींमध्ये प्रथम समिरा संतोष शेंडकर - ४७७/५०० - ९५.४०% मिळवले असून मागासवर्गीय प्रथम क्रमांक राजलक्ष्मी अशोक लकडे ४७०/५००-१४.०० टक्के मिळवत पटकावला . गणित विषयात १०० पैकी ९९ गुण मिळवून राज्यात बोर्डात द्वितीय क्रमांक मिळवल्याबद्दल समीरा शेंडकर हिचे सोमेश्वर पंचक्रोशीतून कौतुक व अभिनंदन होत आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप, सचिव भारत खोमणे तसेच प्राचार्य प्रमोद जगताप सह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## डिंभे धरणातून कालव्यांना पाणी सोडण्याची शेतकऱ्यांची मागणी

**आंबेगाव :** आंबेगाव व शिरूर तालुक्यात वाढत्या उष्णतेमुळे तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून डिंभे धरणातून तातडीने कालव्यांना पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात माजी सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांना निवेदन देण्यात आले. तालुका खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष रमेश खिलारी तसेच राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष वैभव उंडे यांनी शासनाकडे ही मागणी केली आहे. आंबेगाव आणि शिरूर तालुक्यातील बहुतांश नागरिकांचा मुख्य व्यवसाय शेती असून सध्या रब्बी हंगामात पाण्याअभावी पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. भागडी, नागापूर, भराडी, खडकी, थोरांदळे, रांजणी, वळती, जवळे आदी गावांतील विहिरींची पाणीपातळी मोठ्या प्रमाणात घटली आहे. पाण्याअभावी जनावरांसाठीचा हिरवा चारा वाळू लागला असून ऊस व भाजीपाला पिके करपण्याच्या स्थितीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.डिंभे धरणातून तातडीने कालव्यांना पाणी सोडून शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. यावेळी जयेश आगळे, नवनाथ गवारी, मयूर उंडे, मोतीराम उंडे, प्रशांत बराटे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## मिलिंद वाळंज पुणे जिल्हाध्यक्षपदी नियुक्त



**पुणे :** राष्ट्रीय जिल्हा पंचायत असोसिएशनच्या पुणे जिल्हाध्यक्षपदी मिलिंद नंदकुमार वाळंज यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थापक अध्यक्ष कैलास गोरे-पाटील तसेच प्रशिक्षण विभाग प्रमुख शरद बुट्टे-पाटील यांच्या शिफारशीनुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद स्तरावर केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत राष्ट्रीय जिल्हा पंचायत असोसिएशनने पुणे जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी मिलिंद वाळंज यांच्याकडे सोपविली आहे. सामाजिक प्रश्नांवर सातत्याने काम करत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यांचे प्रश्न शासनापर्यंत पोहोचविण्याचे कार्य त्यांनी प्रभावीपणे केले आहे. राष्ट्रीय जिल्हा पंचायत असोसिएशन ही देशातील विविध राज्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांच्या हक्कासाठी कार्य करणारी संघटना असून सदस्यांचे अधिकार, मान-सन्मान आणि विविध मागण्यांसाठी सातत्याने पाठपुरावा करत आहे. आगामी काळात संघटनेची बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी आणि पुणे जिल्ह्यात संघटनेचे कार्य तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी पुणे जिल्हाध्यक्ष मिलिंद वाळंज कार्यरत राहतील, असा विश्वास संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. नियुक्तीनंतर पुणे जिल्हाध्यक्ष मिलिंद वाळंज यांनी सांगितले की, संघटनेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवत पुणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न केले जातील. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यांचे प्रश्न शासनदरबारी मांडून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून सक्रियपणे काम करण्यात येईल. या नियुक्तीबद्दल सामाजिक, राजकीय आणि स्थानिक स्वराज्य क्षेत्रातील मान्यवरांकडून मिलिंद वाळंज यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# ‘लँड टायटलिंग अ‍ॅक्ट’ जुलैमध्ये लागू होणार

### महाराष्ट्र ठरणार देशातील पहिले राज्य - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे ; शासनाकडून कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणांतर्गत दीड हजार कोटीचे करार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** ‘लँड टायटलिंग अ‍ॅक्ट’ येत्या जुलै महिन्यात राज्यात लागू होणार असून असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे. या कायद्यामुळे राज्यातील १४ कोटी जनतेची मालमत्ता ही निश्चित प्रॉपर्टी म्हणून गणली जाणार असून जगातील कुठल्याही देशात ती कॅश करता येईल, असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. भारती विद्यापीठाच्या ६२ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी शिक्षण मंत्री दादाजी भुसे, आमदार भीमराव तापकीर, भारती विद्यापीठाचे कार्यवाह आमदार डॉ. विश्वजीत कदम, कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई, कुलगुरू डॉ. विवेक साळवी यांच्यासह विद्यापीठाचे पदाधिकारी उपस्थित होते. श्री.बावनकुळे म्हणाले, स्वर्गीय डॉ. पतंगराव कदम यांनी शिक्षण क्षेत्रात उभारलेले कार्य हे महाराष्ट्राच्या अभिमानाचे प्रतीक आहे. ‘गल्लीतली शाळा’ ते भारती विद्यापीठाला जागतिक स्तरावर नेण्याचा संकल्प केला आणि तो पूर्ण करून दाखवला. त्यांच्या विचारांचा प्रकाश आज देश-विदेशात पोहोचत आहे. ते म्हणाले, शिक्षणाशिवाय विकसित भारताची संकल्पना पूर्ण होऊ शकत नाही. राज्य शासनाने कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) धोरण राबवून दीड हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार केले आहेत. तसेच दीड लाख विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता ( ए. आय)तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. आगामी काळात विद्यापीठांनी तंत्रज्ञान आणि ए.आय. स्वीकारणे अत्यावश्यक आहे.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रांसाठी कोणत्याही स्टॅम्प पेपरची आवश्यकता राहिलेली नसून विविध प्रमाणपत्रे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान’ अंतर्गत राज्यातील ३० लाख विद्यार्थ्यांपर्यंत आवश्यक कागदपत्रे मोफत पोहोचविण्याची व्यवस्था उभी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान प्रशासन हीच छत्रपती शिवाजी महाराजांची




प्रेरणा असल्याचे सांगत सरकारने समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले पाहिजे, असेही ते म्हणाले. नागपूर येथे भारती विद्यापीठाचा विस्तार व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी आवश्यक जागा व शासनस्तरीय सहकार्य देण्याची ग्वाही दिली. तसेच ‘टिटबिट पॉलिसी’च्या माध्यमातून अडचणीत असलेल्या भूखंडांचा मार्ग काढण्याबाबतही सकारात्मक भूमिका मांडली. यावेळी शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, शिक्षणानेच माणसाची प्रगती होऊ शकते हा संदेश देत पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाची चळवळ उभी केली. त्याच ध्येयाने स्वर्गीय डॉ. पतंगराव कदम यांनी प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण क्षेत्रात वटवृक्ष उभा केला. एका छोट्या खोलीत सुरू झालेल्या शाळेचे आज जागतिक पातळीवरील विद्यापीठात रूपांतर झाले असून हे कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

ग्रामीण व गरीब विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांनी शिक्षणासोबत संस्कार, राष्ट्रभक्ती आणि शिस्तही महत्त्वाची असल्याचे अधोरेखित केले. विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता शिक्षण, सैनिक प्रशिक्षण, विद्यार्थिनींसाठी सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण, शिक्षकांचे प्रशिक्षण, शाळांमध्ये स्वच्छ पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहे यांसारख्या उपक्रमांवर शासन भर देत असल्याचे त्यांनी सांगितले. मराठी शाळांबाबत बोलताना त्यांनी मराठी भाषेबद्दल केवळ भावना व्यक्त न करता प्रत्यक्ष कृतीची गरज असल्याचे नमूद केले. सामान्य व गरीब विद्यार्थ्यांनाही उच्च दर्जाचे शिक्षण देणारे मॉडेल तयार करण्याचे आवाहन त्यांनी भारती विद्यापीठाला केले. भारती विद्यापीठाने गेल्या ६२ वर्षांत लाखो विद्यार्थी घडवून देश-विदेशात शिक्षण क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली असून समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे कार्य पुढेही सुरू ठेवावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी भारती विद्यापीठाचे कार्यवाह आ. विश्वजीत कदम यांनी प्रास्ताविकात भारती विद्यापीठाचे मागच्या ६२ वर्षातील कारकिर्द, समाजिक योगदान, शैक्षणिक क्षेत्रात केलेले काम विशद केले. यावेळी जेष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई यांना दुसरा डॉ. पतंगराव कदम स्मृती पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्याच बरोबर भारती विद्यापीठातील संशोधक, प्राध्यापक, कर्मचारी यांचाही विशेष गौरव करण्यात आला.

## शिक्षक-शिक्षकेत्तर भरतीत गैरव्यवहाराचा आरोप

### हायकोर्टात याचिका दाखल करण्याचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**केडगाव :** दौंड तालुक्यातील एका नामांकित विद्यालयामध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात बोगसपणा झाल्याची जोरदार चर्चा सुरू असून, शासनाच्या लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. शासनाच्या नियमांना पायदळी तुडवत काही कर्मचाऱ्यांना सरकारी पेन्शन योजनेत बसविण्यात आल्याने शासनाची दिशाभूल झाल्याचा आरोप शिक्षक सचिन रुपनवर यांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित विद्यालयात काही पदे विनाअनुदानित तत्त्वावरील असताना देखील संबंधित कर्मचाऱ्यांना २००५ पासून नियुक्ती दाखवून शासनाच्या लाभासाठी पात्र करण्यात आल्याचा आरोप आहे. प्रत्यक्षात प्रतीक्षा भरती प्रक्रिया २०१० मधील असल्याचे सांगितले जात असून, मागील तारखांचे मस्टर तयार करून त्यावर सह्या घेतल्याचे पुरावे उपलब्ध असल्याचा दावा करण्यात आला आहे.

या कथित बोगस भरतीमुळे शासनाचे लाखो रुपये पाण्यात जाण्याची शक्यता व्यक्त होत असून, संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. संबंधित शिक्षण संस्था तसेच शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही चौकशी व्हावी, अशी मागणी सचिन रुपनवर यांनी केली आहे.

याबाबत लवकरच मुंबई हायकोर्टात याचिका दाखल करण्यात येणार असल्याची माहिती देताना रुपनवर म्हणाले की, मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री आणि शिक्षण आयुक्त यांच्याकडेही रीतसर तक्रार दाखल केली जाणार आहे. तसेच बोगस मान्यता देणारे आणि या प्रकाराला सहकार्य करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अन्यायग्रस्त शिक्षकांना न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक त्या सर्व न्यायालयीन लढाया लढणार असून, संबंधित प्रकरणाचा पाठपुरावा वरिष्ठ स्तरावर केला जाणार आहे, अशी भावना सचिन रुपनवर यांनी व्यक्त केली. दरम्यान, या गंभीर आरोपांमुळे दौंड तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली असून, संबंधित विभागाकडून चौकशी होणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## प्रलंबित जमीन मोजणीसाठी खासगी भूमापक नियुक्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** प्रलंबित जमीन मोजणी अर्जांचा जलद निपटारा करण्यासाठी भूमी अभिलेख विभागाने जिल्ह्यात आणखी ४० खासगी भूमापक नियुक्त करण्यास मंजुरी दिली आहे. तसेच आवश्यकता भासल्यास आणखी खासगी भूमापक नियुक्त करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे जिल्ह्यात यापूर्वी नियुक्त करण्यात आलेले ५० खासगी भूमापक आणि नव्याने नेमण्यात येणारे ४० भूमापक मिळून खासगी भूमापकांची संख्या ९० वर पोहोचणार आहे. सरकारी भूमापकांसह ही संख्या २०० पेक्षा अधिक होणार असल्याने जमीन मोजणी प्रकरणांच्या निपटाऱ्यास गती मिळणार आहे. जमीन मोजणीची प्रक्रिया जलद आणि पारदर्शक पद्धतीने व्हावी, यासाठी राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षित परवानाधारक भूमापक आणि भूमापन एजन्सी नियुक्त करण्याचा निर्णय यापूर्वी घेतला होता. त्यानुसार पुणे जिल्ह्यात एका खासगी एजन्सीद्वारे ५० भूमापकांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, पुणे शहर आणि जिल्ह्यातील प्रलंबित मोजणी अर्जांची वाढती संख्या लक्षात घेऊन भूमी अभिलेख विभागाने खासगी भूमापकांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे जमीन मोजणीची प्रक्रिया अधिक वेगाने पूर्ण होण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## कांदा काढताना उष्माघाताने शेतमजूर महिलेचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** शेतात कांदा काढणीच्या कामासाठी आलेल्या एका महिलेचा अचानक मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. नकुशा बाळू सुपे वय ३३ वर्षे, या मूळच्या खेड तालुक्यातील वाडा-सुपेवाडी येथील रहिवासी होत्या. त्या कांदा काढणीच्या कामासाठी आमोंडी येथे आल्या होत्या. दुपारच्या कडक उन्हात काम सुरू असताना त्यांना अचानक चक्कर आली आणि त्या शेतातच त्या कोसळल्या. सोबतच्या कामगारांनी त्यांना तातडीने शिनोली येथील खासगी दवाखान्यात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी घोडेगाव ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. तेथे डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. प्राथमिक माहितीनुसार उष्माघातामुळे मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी मंचर उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला असून अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. या घटनेमुळे सुपे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून वाढत्या तापमानामुळे प्रशासनाने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.



## डोंगराला लागलेल्या आगीत दोन कुटुंबाचा संसार जळून खाक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील लांडेवाडी येथील डोंगर परिसरात लागलेल्या भीषण आगीत दोन कुटुंबांचे मोठे नुकसान झाले. ही घटना शनिवारी (दि.९) दुपारी घडली. दोन महिलांच्या प्रसंगावधानामुळे दोन चिमुकल्यांचे प्राण वाचल्याने मोठी दुर्घटना टळली. दर्यावस्ती परिसरातील गुलाब वसंत केवाळे यांच्या गोठ्याला आग लागून जनावरांचा चारा, शेतीचे साहित्य आणि घरगुती वस्तू जळाल्या. सागर दादाभाऊ केदारी यांच्या झोपडीतील संसारोपयोगी साहित्य आगीत भस्मसात झाले. यावेळी झोपडीत असलेल्या माही सागर केदारी (वय ८ महिने) आणि शिवांश गुलाब केवाळे (वय १० महिने) या बालकांना महिलांनी धाव घेत बाहेर काढल्याने अनर्थ टळला.



घटनेची माहिती मिळताच खंडेराव आढळराव, अभिजित आढळराव पाटील, प्रदीप आढळराव पाटील, सोमनाथ आढळराव पाटील, अविनाश आढळराव पाटील आणि वनमजूर राम उभे यांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. महिलांनी वेळेवर धाव घेतल्यामुळे दोन निष्पाप बालकांचे प्राण वाचले. आगीनंतर कुटुंबांवर मोठे आर्थिक संकट आले असून, शासनाने तातडीने मदत करून नुकसानग्रस्तांना आधार द्यावा, असे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष खंडेराव आढळराव पाटील यांनी सांगितले.

## वसेवाडी जि.प. शाळेचा १०० टक्के निकाल

### ग्रामीण शिक्षणाचा नवा आदर्श

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरूर :** शिरूर तालुक्यातील वसेवाडी (सणसवाडी) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने माध्यमिक विभागाच्या पहिल्याच वर्षी एसएससी बोर्ड परीक्षेत १०० टक्के निकालाची नोंद करत ग्रामीण शिक्षण क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे. लाखो रुपयांची फी घेणाऱ्या खाजगी कॉन्व्हेंट शाळांना मागे टाकत जिल्हा परिषद शाळेने गुणवत्तेच्या जोरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. सार्थ अभिमान : आपली शाळा, आपला अभिमान हे शाळेचे ब्रीदवाक्य प्रत्यक्षात उतरवत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. मुख्याध्यापक संतोष गोसावी यांच्या नेतृत्वाखाली शिक्षकांनी घेतलेल्या परिश्रमामुळे हे यश शक्य झाले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध करत शहरांनाही मागे टाकल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये आदिती सेवागिरी रणपिसे हिने ९३.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. चंद्रिका दिलीपकुमार मठपती हिने ९३ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला. विनिता लखन रैकवार हिला ८९.९० टक्के, ईश्वरी प्रफुल्ल कामटकर हिला ८९.२० टक्के तर तुषार अण्णा ढेकळे याला ८८.४० टक्के गुण मिळाले.

पुणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी या निकालाचे कौतुक करताना सांगितले की, वसेवाडी शाळेचा निकाल हा जिल्हा परिषद शाळांच्या बदलत्या प्रतिमेचे जिवंत उदाहरण आहे. ग्रामीण भागातही उच्च दर्जाचे शिक्षण दिले जात आहे. दहावी आणि बारावीपर्यंत शाळांचा विस्तार करण्याचे व्हिजन या निकालामुळे अधिक बळकट झाले आहे.

शिक्षण विभाग शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनीही शाळेच्या यशाबद्दल अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या यशात शिक्षक गणेश धुमाळ, सुनील खंडागळे, अर्पणा हरगुडे, भाग्यश्री शिवले आणि कोमल हरगुडे यांचे विशेष योगदान राहिले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासाचे मार्गदर्शन न करता आत्मविश्वास वाढवण्यावरही भर दिला. या यशानंतर जिल्हा परिषद अध्यक्ष विरधवल जगदाळे, उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, सदस्या मोनिका हरगुडे, सरपंच शशिकला सातपुते तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणेश दरेकर यांच्या उपस्थितीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.वसेवाडी शाळेच्या निकालामुळे ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत असून वसेवाडी पॅटर्नची चर्चा आता संपूर्ण पुणे जिल्ह्यात सुरू झाली आहे.

## १४ हजार ग्रामपंचायतींचा आर्थिक कारभार ठप्प

### सामूहिक राजीनाम्याचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे :** महाराष्ट्रातील १४ हजारांहून अधिक ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्यात आले असले तरी उच्च न्यायालयाच्या खंडपीठात दाखल विविध याचिकांमुळे ग्रामपंचायतींचे आर्थिक व्यवहार ठप्प झाले आहेत. त्यामुळे गावपातळीवरील विकासकामांवर परिणाम होत असून, या प्रश्नावर तातडीने तोडगा न काढल्यास राज्यातील सरपंच सामूहिक राजीनामे देतील, असा इशारा अखिल भारतीय सरपंच परिषदेने दिला आहे.

राज्यात सध्या १४ हजारांपेक्षा अधिक ग्रामपंचायतींवर प्रशासक कार्यरत आहेत. मात्र न्यायालयीन प्रक्रियेमुळे सरपंचांना केवळ नामधारी प्रशासक म्हणून काम करावे लागत असल्याची भावना सरपंचांमध्ये निर्माण झाली आहे. न्यायालयात दाखल याचिकांवर वारंवार तारखा पडत असताना राज्य शासनाने ठोस भूमिका घेतलेली नसल्याचा आरोप होत आहे.

अखिल भारतीय सरपंच परिषदेचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी सांगितले की, कायद्यात बदल करून राज्यपालांच्या अध्यादेशाद्वारे प्रश्न मार्गी लावावा. अन्यथा राज्यातील सर्व सरपंच सामूहिक राजीनामे देतील. सरपंच संघटनेने सरपंचांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याची मागणी केली होती. मुख्यमंत्री आणि ग्रामविकास मंत्री सकारात्मक असतानाही ग्रामविकास विभागातील अधिकाऱ्यांनी केवळ अधिसूचना काढण्याची घाई केली असल्याचा आरोपही त्यांनी केला.

ग्रामविकास विभागाने न्यायालयीन सुनावण्यांदरम्यान ठोस भूमिका न घेतल्याने जैसे थे परिस्थिती कायम राहिली आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींची विकासकामे पूर्ण होऊनही संबंधितांची बिले अदा करता येत नाहीत. परिणामी ठेकेदार, बांधकाम साहित्य पुरवठादार आणि इतर संबंधितांकडून सरपंचांवर तगादा लावला जात असून अनेक अडचणी निर्माण होत आहेत. शासनाने तातडीने तोडगा काढावा, अन्यथा राज्यभर आंदोलनासह सामूहिक राजीनाम्याचा निर्णय घेतला जाईल, असा इशाराही अखिल भारतीय सरपंच परिषदेचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी दिला.

## आंबा महापुजेने खंडोबादेवाची फळपूजा शेकडोकिलो आंब्याचे सजावट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुरंदर :** खंडोबा मंदिर जेजुरी येथे रविवारी आंबा फळांची भव्य पूजा उत्साहात पार पडली. महाराष्ट्राचे कुलदैवत मानल्या जाणाऱ्या खंडोबा देवाच्या गाभाऱ्याची शेकडो किलो आंब्यांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. मंदिर संस्कृती उपासक गुरव, पुजारी, वीर कोळी आणि गडशी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महा आंबा पूजा सोहळ्यामुळे संपूर्ण गाभारा अंबाबाई स्वरूपात उजळून निघाला होता.

या विशेष पूजाविधीप्रसंगी अ‍ॅड. विश्वास पानसे, पांडुरंग थोरवे तसेच माजी विश्वस्त प्रमुख मंगेश होणे आदी मान्यवर उपस्थित होते. हजारो भाविकांनी मोठ्या श्रद्धेने दर्शन घेत आंबा पूजेचा आनंद लुटला.

गुरव पुजारी सेवेकरी वर्गाकडून गेल्या २५ ते ३० वर्षांपासून दरवर्षी उन्हाळ्यात आंबा फळांची सजावट आणि महाअभिषेकाची परंपरा जपली जात आहे. पहाटे सनई-चौघड्यांच्या मंगल निनादात भूपाळी आरती करण्यात आली. त्यानंतर दुपारच्या महापूजेत चंदन उटी अर्पण करून खंडोबा देवाला शीतलता प्रदान करण्यात आली आणि हजारो आंब्यांनी संपूर्ण गाभारा सजविण्यात आला.

आंबा हा फळांचा राजा मानला जात असल्याने त्याला ऐतिहासिक, पौराणिक आणि सांस्कृतिक महत्त्व प्राप्त आहे. विविध ग्रंथ आणि उपनिषदांमध्ये आंब्याचा उल्लेख आढळतो. त्यामुळे वैशाख महिन्यात या पवित्र फळाची देवाला अर्पण करून कृपा प्राप्त करण्याची परंपरा प्राचीन काळापासून सुरू असल्याचे मानले जाते.



दरवर्षीप्रमाणे यंदाही महा आंबा पूजनानंतर गुरव, वीर कोळी, गडशी आणि मार्तंड देवस्थान यांच्या वतीने खंडोबा दर्शनासाठी आलेल्या शेकडो भाविकांना आमरस-पुरीचा प्रसाद वाटप करण्यात आला. चंपाषष्ठी उत्सवासह विविध धार्मिक सोहळ्यांमध्ये गेली अनेक वर्षे अन्नदानाच्या माध्यमातून भाविकांची सेवा केली जात असल्याने या आंबा पूजेला विशेष धार्मिक आणि सामाजिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

# २० मे रोजी औषध विक्रेत्यांचा देशव्यापी बंद

## ऑनलाईन औषध विक्रीविरोधात आंदोलन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** अखिल भारतीय औषध विक्रेता संघटना यांच्या वतीने बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री तसेच कार्पोरेट कंपन्यांकडून होत असलेल्या अव्यावसायिक स्पर्धेविरोधात २० मे २०२६ रोजी देशव्यापी औषध विक्रेता बंद पुकारण्यात आला आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार औषधी व्यवसाय हा ड्रींसी रपव डौशींळली -र्ली १९४० व ठींश्रश १९४५ अंतर्गत चालविला जातो. मात्र ऑनलाईन औषध विक्रीबाबत या कायद्यात कोणतीही स्पष्ट तरतूद नसतानाही देशभरात मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन औषध विक्री सुरू आहे.

केंद्र सरकारने २८ ऑगस्ट २०१८ रोजी ८१७ अंतर्गत ऑनलाईन औषध विक्रीसंदर्भात नोटिफिकेशन जारी केले होते. मात्र त्याचे अद्याप कायद्यात रूपांतर झालेले नाही. याविरोधात दिल्ली उच्च न्यायालय येथे रिट याचिका दाखल असून न्यायालयाने ऑनलाईन औषध विक्रीस स्थगिती दिल्याचे संघटनेने म्हटले आहे. तरीदेखील सरकार याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

कोरोना काळात सरकारने २६ मार्च २०२० रोजी ऋडघ २२० नोटिफिकेशनद्वारे औषधांची होम डिलिव्हरी करण्यास विशेष सवलत दिली होती. मात्र कोरोना संपून पाच वर्षे उलटल्यानंतरही हे नोटिफिकेशन रद्द करण्यात आले नसल्याचा दावा संघटनेने केला आहे. याचाच गैरफायदा घेत ऑनलाईन कंपन्या मोठ्या प्रमाणावर सवलती देत औषध विक्री करत असल्याचे सांगण्यात आले.

राज्य संघटनेचे नेते जगन्नाथ शिंदे यांनी सांगितले की, जीवशी २०१३ अंतर्गत जीवनावश्यक औषधांवर होलसेलरला ८ टक्के व रिटेलरला १६ टक्के नफा निश्चित करण्यात आला आहे. तसेच अनियंत्रित औषधांवर होलसेलरला १० टक्के व रिटेलरला २० टक्के नफा दिला जातो. मात्र कार्पोरेट कंपन्या २० ते ५० टक्क्यांपर्यंत सवलत देत असल्याने छोट्या औषध विक्रेत्यांचा व्यवसाय धोक्यात आला आहे.

देशातील सुमारे १२.५० लाख औषध विक्रेत्यांचे अस्तित्व धोक्यात येत असून ग्रामीण भागातील औषध वितरण व्यवस्थेवरही परिणाम होण्याची शक्यता संघटनेने व्यक्त केली आहे. औषध विक्रेत्यांना डॉक्टरांनी लिहिलेल्या औषधांच्या पर्यायी ब्रँड देण्याचा अधिकार मिळाल्यास स्पर्धेला सक्षमपणे सामोरे जाता येईल, अशी मागणीही संघटनेकडून करण्यात आली आहे.

राज्य संघटनेचे सचिव अनिल नावंदर यांनी महाराष्ट्रातील बंद १०० टक्के यशस्वी होईल, असा विश्वास व्यक्त केला. सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने सभासदांमध्ये तीव्र नाराजी असल्याचे त्यांनी सांगितले.

यासंदर्भातील माहिती गजानन शिंदे व रामचंद्र आयलाणी यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.



### बंदमध्ये जिल्ह्यातील केमिस्ट बांधवांनी सहभागी व्हावे

देशभरात वाढत चाललेल्या बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्रीला विरोध करत तसेच कार्पोरेट कंपन्यांकडून निर्माण करण्यात येणाऱ्या अव्यावसायिक स्पर्धेविरोधात अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने दि. २० मे रोजी देशव्यापी औषध विक्रेता बंदची घोषणा केली आहे. एआयओसीडीचे अध्यक्ष जगन्नाथ स. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हा बंद पुकारण्यात आला असून, जिल्ह्यातील सर्व केमिस्ट बांधवांना या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष दत्ता गाडळकर व सचिव आबासाहेब बेद्रे यांनी केले आहे.

द•ख•ल

## राष्ट्रीय लोकअदालतीत ४.९१ कोटींची वसुली : ४००४ प्रकरणे निकाली



**लिंपणगाव :** श्रीगोंदा येथे ९ मे रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतीमध्ये विविध प्रकारची एकूण ४००४ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. यात तब्बल ४ कोटी ९१ लाख २४ हजार ९२ रुपयांची वसुली करण्यात आली. यावेळी जिल्हा न्यायाधीश एस. एच. साळुंखे यांनी पक्षकारांनी जास्तीत जास्त प्रकरणे लोकन्यायालयामध्ये निकाली काढून वेळ व पैसा वाचवावा, असे आवाहन केले. ते म्हणाले, पूर्वी गावांमध्ये पंचासमक्ष भांडणे मिटवली जात असत, त्याच धर्तीवर लोकअदालतीत तडजोडीने वाद मिटवले जातात. लोकअदालतीमुळे पक्षकारांना जलद न्याय मिळून परस्परांतील सलोखाही कायम राहतो. श्रीगोंदा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. जे. बी. शिंदे यांनी लोकअदालतीचे महत्त्व व फायदे याविषयी माहिती देत जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमास तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ एम. एम. राव, सहदिवाणी न्यायाधीश श्री. ए. एन. कुलकर्णी, एच. जे. पठाण, आर. बी. खवले यांच्यासह श्रीगोंदा-कर्जत-जामखेड बार असोसिएशनचे अध्यक्ष ड. एस. वाय. पत्की, विविध वकील, पंचायत समिती, ग्रामपंचायत, बँका, नगरपरिषद, महावितरण विभागाचे अधिकारी-कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, पोलीस कर्मचारी व पक्षकार उपस्थित होते.

## स्मितल भैया वाबळे पाटील यांची रयत शिक्षण संस्थेच्या समन्वय समितीवर निवड

**श्रीगोंदा :** रयत शिक्षण संस्था या आशिया खंडातील सर्वात मोठ्या शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय समन्वय समिती सदस्यपदी



मढेवडगावचे भूमिपुत्र तथा अहिल्यानगर जिल्हा युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष स्मितलभैया वाबळे यांची निवड झाली . या निवडीमुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून मढेवडगावच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विशेष म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मृतिदिनाच्या पार्श्वभूमीवर ही घोषणा झाल्याने या निवडीला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.शेतकरी, कष्टकरी आणि बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचा प्रकाश देणाऱ्या रयत शिक्षण संस्थेच्या समन्वय समितीवर स्थान मिळवणे, ही केवळ स्मितलभैया यांची वैयक्तिक उपलब्धी नसून मढेवडगावच्या मातीच्या संस्कारांचा आणि संघर्षाचा गौरव असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. स्मितलभैया वाबळे हे सध्या रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय सल्लागार सदस्य म्हणून कार्यरत असून शिक्षक, विद्यार्थी आणि सामान्य कार्यकर्त्यांच्या प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे. सामाजिक बांधिलकी, निस्वार्थ वृत्ती आणि अडचणीतल्या माणसासाठी धावून जाणारा नेता अशी त्यांची ओळख आहे.अवघ्या ३८ व्या वर्षी या समितीतील सर्वात कमी वयाचे सदस्य होण्याचा मान त्यांनी मिळवला.

## प्रतिकूल परिस्थितीवर मात करत वेदिका नलवडे काष्टी केंद्रात ९६% गुण मिळवून प्रथम

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या नवभारत माध्यमिक विद्यालय आनंदवाडी (गणेशा)



येथील दहावीचा निकाल १००% लागला आहे. कु.वेदिका दिगांबर नलवडे हिने ९६ %गुण मिळवून काष्टी केंद्रात पहिला क्रमांक मिळविण्याचा मान मिळविला आहे. कु.वेदिका हिने गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळविले आहे. कु.वेदिका हिने प्रतिकूल परिस्थितीवर मात मिळवून वेळप्रसंगी आई वडिलांना हॉटेल व्यवसायात मदत करीत असे काही वेळेस तर हॉटेल मध्ये बसून अभ्यास करीत होती पण जिद्द फार मोठी होती. दहावीला जास्त मार्क मिळाले पाहिजेत. ते स्वप्न आज साकार झाले. कु.वेदिका हिच्या या यशाबद्दल संस्था अध्यक्ष भगवानराव पाचपुते, उपाध्यक्ष भास्करराव जगताप, संस्था विश्वस्त ॲड.प्रताप पाचपुते, मुख्याध्यापक सुनिल गिरमकर, नामदेव सोनटक्के,सुजाता दिवेकर,शिंदे सर, राहुल साळवे, आनंदवाडीचे सरपंच छाया ढमढेरे, उपसरपंच विठ्ठल गिरमकर, जिल्हा परिषद सदस्या पंचशिलाताई गिरमकर आदिंनी अभिनंदन केले आहे.कु.वेदिका हिला गणित विषयाचे शिक्षक अशोक कांडेकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले होते.

## भारत की बेटी पुरस्काराने सायली ढोले यांचा सन्मान



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** पुणे येथील मिडीया वर्ल्ड तर्फे दिला जाणारा भारत की बेटी पुरस्कार सायली राजेंद्र ढोले यांना समारंभ पूर्वक मान्यवरांच्या हस्ते शनिवारी (दि. ९) प्रदान करून सन्मानित करण्यात आले. मातृदिनाचे औचित्य साधून पुणे येथील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक सभागृह, घोले रोड, शिवाजीनगर येथे दि. ९ मे रोजी सकाळी ११ वाजता पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. पुणे शहराच्या महापौर मंजुषा नागपुरे, पुण्याच्या सहाय्यक पोलिस आयुक्त अनुजा देशपांडे, पुणे जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती अंकिता पाटील ठाकरे, नवेली देशमुख आदी मान्यवरांच्या हस्ते 'भारत की बेटी पुरस्कार हा पुरस्कार सायली ढोले यांना प्रदान करण्यात आला. सायली हिने बँकिंग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल तिची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. सन्मानचिन्ह , प्रमाणपत्र व शाल - श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे शेवगाव तालुकाध्यक्ष राजेंद्र ढोले यांची सायली ही कन्या आहे. या पुरस्काराबद्दल सायली हिचे गटविकास अधिकारी सोनल शहा व गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ यांनी अभिनंदन केले आहे.

## कोल्हार उदरमल घाटाच्या कामाचा वनवास संपेना

### जय हिंद सेवा फौंडेशनची विभागीय आयुक्तांकडे धाव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिराळ चिचोंडी :** गेल्या तीन वर्षांपासून रखडलेल्या कोल्हार-उदरमल घाट रस्त्याच्या कामाला अद्याप मुहूर्त सापडलेला नाही. वारंवार आंदोलने आणि निवेदने देऊनही सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित ठेकेदाराने या कामाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. अखेर या गंभीर प्रश्नी जय हिंद सेवा फाउंडेशनने नाशिकचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्याकडे धाव घेऊन लेखी पत्राद्वारे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.



**आश्वासने हवेतच प्रवाशांचे हाल कायम**

अहिल्यानगर-बुऱ्हाणगर-कोल्हार या जिल्हा मार्ग ४९ च्या सुधारणेसाठी मार्च २०२४ मध्ये ३५० लक्ष रुपयांच्या निधीचे भूमिपूजन झाले होते. मात्र, भूमिपूजनानंतर काही दिवस काम सुरू करून ठेकेदाराने काम अर्धवट सोडले. जय हिंद सेवा फौंडेशनने फेब्रुवारी २०२५ मध्ये आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर केवळ खड्डे बुजवण्याचे काम करून प्रशासन आणि ठेकेदाराने नागरिकांच्या डोळ्यात धुळफेक केली. पावसाळ्यापूर्वी घाट रस्ता व रुंदीकरण पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले होते, परंतु प्रत्यक्षात परिस्थिती 'जैसे थे' आहे.

**अपघातांचे सत्र आणि आरोग्याचा प्रश्न**

कोल्हार घाट हा जेऊर, चिचोंडी शिराळ, पाथर्डी, शेवगाव आणि नेवासा तालुक्यांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. रस्ता पूर्णपणे उखडल्यामुळे या मार्गावर अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

दररोज प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आणि कामगारांच्या मणक्याचे आजार बळावले आहेत.

गरोदर महिलांना दवाखान्यात नेताना खड्ड्यांमुळे मोठी कसरत करावी लागत असून त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.शेतमाल नगर मार्केटला नेण्यासाठी शेतकऱ्यांना या खराब रस्त्यामुळे आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

**निधी गेला कुठे? नागरिकांचा सवाल**

माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या माध्यमातून या रस्त्यासाठी मोठा निधी उपलब्ध झाला होता. रस्ता रुंदीकरणासाठी नाशिक विभागाची परवानगी मिळालेली असतानाही केवळ साईड पट्ट्या टाकून काम का थांबवले? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. मंजूर झालेला निधी नेमका कुठे खर्च झाला, याची चौकशी करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

**तीव्र आंदोलनाचा इशारा**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी आठ दिवसांत काम सुरू करण्याचे आश्वासन देऊन आम्हाला केवळ वेळकाढूपणा केला. जर तिसऱ्या वर्षीही पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण झाले नाही, तर प्रशासन आणि ठेकेदाराच्या विरोधात तीव्र जनआंदोलन छेडले जाईल. असा इशारा जय हिंद सेवा फौंडेशनचे अध्यक्ष शिवाजी पालवे यांनी दिला आहे.

अहिल्यानगर, कोल्हार, उदरमल, चिचोंडी, धारवाडी, मिरी यांसह अनेक गावांतील ग्रामस्थांनी आता प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे. विभागीय आयुक्तांच्या हस्तक्षेपानंतर तरी या घाटाचा वनवास संपणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## सोनमाळी कन्या विद्यालयाला कर्मवीर पारितोषिक



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** रयत शिक्षण संस्थेत उत्कृष्ट व सर्वोत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल कर्जतच्या सोनाबाई नामदेवराव सोनमाळी कन्या विद्यालयास मानाच्या कर्मवीर पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त दि. ९ मे रोजी सातारा येथे भव्य समारंभात हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

रयत शिक्षण संस्थेत दरवर्षी विविध शाखेतील उल्लेखनीय शैक्षणिक कार्यावरून मूल्यांकन ठरवत त्या शाळा-विद्यालयाला कर्मवीर पारितोषिकाने गौरविण्यात येते. यंदा कर्जतच्या सौ सोनमाळी कन्या विद्यालयाने शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास, विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आणि संघटित कार्यपद्धतीच्या बळावर कर्मवीर पारितोषिकावर आपले नाव कोरले. हा मानाचा पुरस्कार रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरदचंद्र पवार, संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, खा. सुप्रिया सुळे, कर्जत-जामखेडचे आ. रोहित पवार तसेच जनरल बॉडी सदस्य राजेंद्र फाळके यांच्या उपस्थितीमध्ये कन्या विद्यालयास प्रदान करण्यात आला. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका महेजबीन पठाण, पर्यवेक्षक दादासाहेब गलांडे यांच्यासह विद्यालयाचे सर्व सेवकवृंद उपस्थित होते. कन्या विद्यालयाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी तसेच विविध सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सर्वत्र विद्यालयाच्या कार्याचे कौतुक करण्यात येत आहे.

## पाणीटंचाईच्या प्रश्नासाठी मुख्यमंत्र्यांना निवेदन

### लाडजळगाव परिसरातील पाझरतलाव दुरुस्तीची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव :** शेवगाव तालुक्यातील लाडजळगाव येथील नागरिक तथा शेतकरी प्रतिनिधी प्रमोदकुमार ताराचंद छाजेड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना इमेलद्वारे निवेदन देत धनगर वस्ती व कोकटवाडी येथील पाझरतलाव दुरुस्तीची मागणी केली आहे. तसेच गोळेगाव येथील तलावाचे मध्यम प्रकल्पात रूपांतर करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागात कायमस्वरूपी पाण्याचा स्रोत नसल्याने शेतकरी बांधवांचे जीवन पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे. पाऊस वेळेवर व चांगला झाल्यास खरीप पिकातूनच शेतकऱ्यांची गुजराण होत असते. मात्र पाणीटंचाईमुळे दरवर्षी शेती आणि जनजीवनावर परिणाम होत आहे.

धनगर वस्ती व कोकटवाडी येथील पाझरतलावांचे खोलीकरण, गाळ काढणे तसेच भिंतींमधून होणारा पाझर थांबविण्याची कामे झाल्यास परिसरातील विहिरींना अधिक काळ पाणी उपलब्ध राहू शकते. त्यामुळे शेतकरी, पशुपालक व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळेल, असे निवेदनात म्हटले आहे.

यासोबतच गोळेगाव येथील सुमारे ५० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या तलावाच्या दोन्ही बाजूंना डोंगररांग असल्याने पाणी साठवण क्षमता वाढविण्यास मोठी संधी असल्याचे सांगण्यात आले आहे. शासनाने या तलावाचे मध्यम प्रकल्पात रूपांतर केल्यास आसपासच्या १५ ते २० गावांना याचा मोठा फायदा होऊ शकतो, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

शेवगाव तालुक्याचा पूर्व भाग हा पाणी व विकासाच्या बाबतीत दीर्घकाळ उपेक्षित राहिल्याची खंत व्यक्त करत मुख्यमंत्र्यांनी या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन संबंधित विभागामार्फत तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी प्रमोदकुमार छाजेड यांनी केली आहे.

## आगीच्या तांडवात हरवला पक्षांचा किलबिलाट ; राखेत बदलली वनराई

### बहिरवाडी परिसरातील वणव्यात शेकडो हेक्टर क्षेत्र जळून खाक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** इमामपूर, बहिरवाडी, मजले चिंचोली परिसरातील वणव्याने शेकडो हेक्टर क्षेत्र भस्मसात झाले असून दुर्मिळ वनस्पतींचा विनाश व वन्यजीवांचे मोठे हाल झाले. मागील आठवड्यात बहिरवाडी परिसरात लागलेल्या वणव्याने वनसंपदेचे मोठे नुकसान झाले आहे.

पाथर्डी व नगर तालुक्याच्या सीमेवर असलेल्या कोल्हार घाट परिसरातील वनक्षेत्राला मागील आठवड्यात वणवा लागला होता. यापूर्वीच पाथर्डी हद्दीतील मोठे वनक्षेत्र वणव्यात जळून खाक झालेले आहे. उष्ण वाऱ्यासह पेटलेल्या आगीने शेकडो हेक्टर वनक्षेत्र काही तासात जळून खाक झाले. हिरवाईने नटलेले डोंगर आता काळ्याकुट्ट राखेच्या ढिगाऱ्यात बदलले आहेत. वणव्यात अनेक दुर्मिळ औषधी वनस्पती, झाडे, गवताळ क्षेत्र आणि पक्षांची घरटी भस्मसात झाली.



**शेतकऱ्यांनी डोंगराच्या कडेला आपल्या शेत जमिनीचे बांध जाळू नयेत. जेणेकरून वनक्षेत्राला धोका निर्माण होईल. वन हद्दीमध्ये धूम्रपान, स्वयंपाक करू नये. अन्यथा कडक कारवाई करण्याचा इशारा वनविभागाच्या वतीने देण्यात आला आहे. तसेच गावोगावी वणवा विरोधी पथक स्थापन करण्यासाठी स्थानिकांनी वनविभागाला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.**

वणव्यामुळे ससे, साळींदर, रानडुक्कर, घोरपड, कोल्हे, साप यासारखे वन्यजीव जिव वाचवण्यासाठी सैरावैरा पळताना दिसून आले. काही पक्षांची पिल्ले आणि लहान प्राणी आगेत होरपळल्याची भीती व्यक्त केली जात आहे. माणसांच्या चुकीची शिक्षा मुक्या जीवांना का ? असा संतप्त सवाल पर्यावरण प्रेमींमधून उपस्थित होत आहे.

दरवर्षी उन्हाळा सुरू होताच वणव्याच्या घटना घडतात. वन विभागाच्या वतीने वणव्यापासून संरक्षण होण्यासाठी 'जाळरेषा' मारण्यात आलेल्या आहेत. परंतु तरीदेखील मानवी निष्काळजीपणा तर काही ठिकाणी विद्युत महावितरण कंपनीचा गलथानपणा यामुळे निसर्गाचा घात होत असल्याचे चित्र दिसून येते. अनेक वनक्षेत्रातून विद्युत वाहिन्या गेलेल्या आहेत. लोंबकळणाऱ्या विद्युत वाहिन्यांच्या स्पार्किंग मुळे वणव्याच्या घटना घडत असतात. बहिरवाडी परिसरात देखील शॉर्टसर्किटमुळे वणवा पेटल्याचे बोलले जात आहे.

## ल्युमॅक्स इंडस्ट्रीजची मेगा भरती ; जागेवरच निवड

### जामखेडमध्ये रोजगाराची मोठी संधी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** पुणे येथील चाकण औद्योगिक परिसरातील आघाडीची ऑटोमोबाईल कंपनी लुमॅक्स इंडस्ट्रीज यांच्या वतीने जामखेड शहरात दि. १२ रोजी भव्य रोजगार मेळावा व वॉक-इन इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून तालुक्यातील बेरोजगार युवक-युवतींना नामांकित कंपनीमध्ये नोकरीची मोठी संधी उपलब्ध होणार असून, पात्र उमेदवारांची जागेवरच मुलाखत घेऊन थेट निवड करण्यात येणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर तसेच उद्योजक व कुसडगावचे माजी सरपंच बापूसाहेब कार्ले यांच्या पुढाकारातून हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील तरुणांना नोकरीसाठी पुण्यात जाऊन पायपीट करावी लागू नये, यासाठी कंपनीची भरती प्रक्रिया थेट जामखेडमध्ये आणण्यात आली असल्याचे आयोजकांनी सांगितले.

पंचायत समितीसमोरील जामखेड सेंट्रल कॉम्प्लेक्स मधील बी.के. शिंदे महाविद्यालय येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मुलाखती होणार आहेत. कंपनीला मोठ्या प्रमाणावर कुशल व अकुशल मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने तालुक्यातील शेकडो तरुणांना रोजगार मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

या भरती प्रक्रियेसाठी १० वी, १२ वी उत्तीर्ण, आयटीआय (खढख), कोणत्याही शाखेतील पदवीधर, तसेच बी.ई. व डिप्लोमा धारक उमेदवार पात्र असणार आहेत. बी.ई. व डिप्लोमा धारकांची नियुक्ती डिप्लोमा इंजिनिअर ट्रेनी (ऊएढ) म्हणून करण्यात येणार असून इतर पात्र उमेदवारांना असोसिएट ट्रेनी म्हणून संधी दिली जाणार आहे.

डिप्लोमा इंजिनिअर ट्रेनी पदासाठी पहिल्या वर्षी २४,४३८, दुसऱ्या वर्षी २६,५६६ आणि तिसऱ्या वर्षी २८,५६८ इतके वेतन देण्यात येणार आहे. तसेच असोसिएट ट्रेनी पदासाठी २२,२८१ ते २४,४३८ इतके स्टायपेंड मिळणार आहे. सर्व पदांसाठी १२ तासांची शिफ्ट असणार आहे.

कंपनीकडून कर्मचाऱ्यांना मोफत कॅन्टीन तसेच मोफत बस सुविधा देण्यात येणार आहे. भोसरी, चाकण, मोशी, आळंदी, देहू, वासुली, आंबेठाण, खालुंब्रे, बिरदवाडी आणि सावरदरी या मार्गांवर बस सुविधा उपलब्ध असणार आहे.

मुलाखतीसाठी येताना उमेदवारांनी आपला अद्ययावत बायोडाटा, आधार कार्ड, पासपोर्ट साईज फोटो तसेच सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती सोबत आणणे आवश्यक आहे. निवड झालेल्या उमेदवारांना जागेवरच नियुक्तीपत्र देण्यात येणार असून, त्यांना पुणे येथे कंपनीत रुजू होण्यासाठी तातडीने बस सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

तालुक्यातील जास्तीत जास्त बेरोजगार तरुणांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विजयसिंह गोलेकर व बापूसाहेब कार्ले यांनी केले आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
सोमवार, दि.११ मे २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## ओंकार गायकवाड मृत्यूप्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : आपल्या आजीसोबत मंदिरात जात असताना भरधाव इर्टिगा कारच्या धडकेत ठार झालेल्या ओंकार गायकवाड याच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या राहात्यातील चार नराधमां विरोधात सदोष मणुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांना अटक करण्यात आली आहे. ओंकारची आजी पुष्पा पांडुरंग गायकवाड यांनी राहाता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यात म्हटले आहे की, मी व माझा नातू ओंकार (वय १३) आम्ही आंबेडकर चौक ते सावता माळी मंदिर राहाता या दरम्यान रस्त्यावर फिरण्यासाठी गेलो असता त्यावेळी सदाफाळ गल्लीतुन चारचाकी सफेद रंगाची इरटीगा गाडी भरधाव वेगाने आली त्या गाडीने धडक दिल्याने ओंकार रस्त्यावर पडला. त्या गाडीत गौरव भोसले, संस्कार विखे, गोकुळ चिकणे, अमन पाववाला सर्व रा. ता राहाता हे सर्व त्या गाडीमध्ये होते. तर संस्कार विखे गाडी चालवत होता. यांनी ओंकार याचे अंगावर गाडी घालून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. अशी फिर्याद राहाता पोलिस ठाण्यात दिली आहे. यावरून गौरव भोसले, संस्कार विखे, गोकुळ चिकणे, अमन पाववाला यांचे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वेश्या व्यवसाय चालवणाऱ्या तीन हॉटेल व लॉजवर पोलिसांचा छापा

## १० जणांवर गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा फाटा येथील तीन हॉटेल व लॉजवर पोलिसांचा संयुक्त टाकण्यात आलेल्या छाप्यात वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या हॉटेल मालक मॅनेजर व ग्राहकांसह १० जणांवर 'पिटा' कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक श्री मुमक्का सुदर्शन यांच्या आदेशांन्वये व मिळालेल्या गुप्त माहितीवरून अप्पर पोलीस अधीक्षक श्री सोमनाथ वाकचौरे, श्री वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली शेवगाव आणि नेवासा पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने नेवासा फाटा येथील तीन लॉजवर मोठी कारवाई केली आहे.

या कारवाईत महिलांना पैशाचे आमिष दाखवून बळजबरीने वेश्याव्यवसाय करवून घेणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला असून गुन्हा रजिस्टर क्रमांक ३६३/२०२६भारतीय न्याय संहिता कलम १४३सह स्त्रीया व मुली यांचे अनैतिक व्यापारास (प्रतिबंध) कायदा १९५६ पिटा चे कलम ३,४,५,७,८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी की दि. ९ मे २०२६ रोजी नेवासा फाटा हद्दीतील तिरंगा लॉज, मित्रप्रेम आणि नामगंगा लॉजमध्ये महिलांकरवी कुंटणखाना चालवला जात असल्याची माहिती वरिष्ठांकडून प्राप्त झाली होती. या माहितीची खात्री करण्यासाठी पोलिसांच्या पथकाने डमी ग्राहक




तयार करून त्यांना प्रत्येकी ५०० रुपयांच्या नोटा देऊन या तीनही ठिकाणी पाठवले.

डमी ग्राहकांचा इशारा मिळताच पोलिसांनी एकाच वेळी तिरंगा हॉटेल, मित्रप्रेम हॉटेल आणि नामगंगा हॉटेल येथे धाड टाकली. या छाप्यात हॉटेल मालक आणि मॅनेजर हे स्वतः च्या आर्थिक फायद्यासाठी पिडीत महिलांना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून बळजबरीने देहविक्री करवून घेत असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी घटनास्थळावरून डमी ग्राहकांना दिलेल्या ५०० रुपयांच्या नोटा आणि इतर आक्षेपार्ह साहित्य जप्त केले आहे. या कारवाई दरम्यान अडकलेल्या ११ पिडीत महिलांची सुटका करण्यात आली असून त्यांना पुढील कारवाईसाठी नेवासा पोलीस ठाण्यात आणण्यात आले आहे.

### गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे

तिरंगा हॉटेल प्रकाश शेंडगे (हॉटेल मालक, रा. नेवासा खुर्द),इक्बाल अबुल मंडाल (हॉटेल मॅनेजर, रा. कल्याण, जि. ठाणे),मित्रप्रेम हॉटेल सचिन कोळेकर (हॉटेल मालक, रा. नेवासा),सुरेश बन्सी कांबळे (हॉटेल मॅनेजर, रा. मुकींदपूर, ता. नेवासा),नामगंगा हॉटेल अजय कोळेकर (हॉटेल मालक),अजित सुभाष बर्डे (हॉटेल मॅनेजर, रा. मक्तापूर, ता. नेवासा)

### वेश्याव्यवसायाला प्रोत्साहन देणारे ग्राहक

अमोल एकनाथ पारखे (रा. वायगाव, ता. गंगापूर)दिपक बाबासाहेब शिंदे (रा. वडाळा, ता. नेवासा), प्रणव नवनाथ नजन रा. माळी चिंचोरा, ता. नेवासा,दिपक रघुनाथ वांदेकर, सदरच्या छापा कारवाईत पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे,नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले ,सहायक पोलीस निरीक्षक रामहरी खेडकर, सहायक पोलीस निरीक्षक अमोल पवार,पोलीस उपनिरीक्षक विकास पाटील,पोलीस हवालदार संदीप आव्हाड,पोलीस शिपाई राहुल खेडकर, संपत खेडकर, भगवान सानप,शाम गुंजाळ, देविदास तांदळे,महिला पोलीस शिपाई प्रियंका शिरसाठ.सहायक फौजदार नागरगोजे,पोलीस हवालदार राठोड, पोलीस नाईक काळोखे, किरण पवार,पोलीस शिपाई गंगावणे, जाधव, यांनी केलेली आहे.

हॉटेल चालक व ग्राहक यांना ताब्यात घेण्यात आले असून, हॉटेल मालकांचा शोध सुरू आहे. पुढील तपास नेवासा पोलीस निरीक्षक सागर ढिकले करत आहे.

## कर्णकर्कश आवाजामध्ये गाणी लावून ध्वनी प्रदुषण, पाच जणांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील मातोश्री मंगल कार्यालयात एका लग्न सोहळ्यात डी.जे. साऊंड सिस्टीम लावून कर्णकर्कश आवाजामध्ये गाणी लावून ध्वनी प्रदुषण केले व पोलीसांनी वेळोवेळी आवाज कमी करण्याबाबत सांगूनही सरकारी कामात इच्छापुर्वक अटकाव करुन अडथळा निमार्ण करून सर्वोच्च न्यायालयाने ध्वनी क्षेपकाबाबत घालून दिलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील प्रसाद चौधरी यांच्या मालकीच्या मातोश्री मंगल कार्यालयात शरद ऊर्फ सौरभ लोखंडे रा. श्रीरामपूर यांनी लग्न कार्यक्रमाचे आयोजन केले.

या परिसरात लहान मुलाचे भळगट हॉस्पिटल आहे. तसेच सदरचे मंगल कार्यालय हे लोक वस्तीमध्ये असताना सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा येईल असे स्थितीत उभा करून क्र.एम.एच. १६ ए.ई.६१३१ टाटा सुपर एस या वाहनामध्ये ऋ-छएडक०९+ अशा नावाचा डिजेवर कर्णकर्कश आवाजात गाणे वाजवून ध्वनी प्रदुषण चालू ठेवले. पोलीस उपनिरीक्षक नवनाथ बर्डे यांनी तात्काळ डी.जे साऊंड सिस्टीमचा आवाज मर्यादत ठेवा अशी तोंडी सूचना देऊनही डीजे चालक सौरभ संजय थोरात, डीजे ऑपरेटर व सोमनाथ रविंद्र शिरसाठ यांना डी.जे. साऊंड सिस्टीम लावून कर्णकर्कश आवाजामध्ये गाणी लावून ध्वनी प्रदुषण केले व पोलीसांनी वेळोवेळी आवाज कमी करण्याबाबत दिलेल्या सूचनांकडे दूर्लक्ष केले.

सर्वोच्च न्यायालयाने ध्वनी क्षेपकाबाबत घालून दिलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन केले. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात पोलीस कॉन्स्टेबल मच्छिंद्र सोन्याबापू चेमटे यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी डीजे चालक गणेश अरुण गिते, सौरभ संजय थोरात, सोमनाथ रविंद्र शिरसाठ, मातोश्री मंगल कार्यालाचे मालक प्रसाद चौधरी, कार्यक्रमाचे आयोजक शरद ऊर्फ सौरभ लोखंडे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २२३,२२१,२८५ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ३,१५ व ध्वनी प्रदूषण अधिनियम २००० चे कलम ३,४,५,६ अन्वये सरकारतर्फे कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गर्भलिंग निदान प्रकरणी हत्येचे गुन्हे दाखल करा : आ. ओगले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : राहाता तालुक्यातील निर्मळ पिंपरी येथे उघडकीस आलेल्या बेकायदा गर्भलिंग निदान व स्त्री भ्रूणहत्या प्रकरणाने राज्यभर खळबळ उडाली असून, या प्रकरणातील मुख्य सूत्रधार डॉ. रवींद्र कुटे व त्यांच्या साथीदारांवर थेट हत्येचे गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी आमदार हेमंत ओगले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

आ. ओगले यांनी पत्रात म्हटले आहे की, जीव वाचविण्याचा व्यवसाय करणाऱ्या काही डॉक्टरांनी पैशाच्या हव्यासापोटी मुलींच्या जन्माआधीच त्यांची हत्या करण्याचा घृणास्पद उद्योग सुरू केला आहे.



ही घटना अमानवी असून महाराष्ट्राच्या सामाजिक विवेकाला काळिमा फासणारी आहे. त्यामुळे या गुन्ह्यातील आरोपींवर केवळ गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्यांतर्गत कारवाई न करता, खुनाचे गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच डॉ. कुटे व संबंधित अन्य डॉक्टरांचे वैद्यकीय परवाने तत्काळ आणि कायमस्वरूपी रद्द करण्यात यावेत, अशी मागणीही त्यांनी केली. श्रीरामपूर-राहुरी विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये स्त्री जन्मदर ८०० पेक्षा कमी झाला असून ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

या विषयावर २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्न उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले होते. तरीदेखील अशा प्रकारचे रॅकेट सुरू राहणे हे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे असल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून केवळ डॉक्टरच नव्हे, तर त्यांना मदत करणारे अधिकारी, कर्मचारी आणि इतर संबंधितांवरही कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

अशा नराधमांना कोणतीही सहानुभूती दाखविणे म्हणजे समाजातील मुलींच्या अस्तित्वालाच धोका निर्माण करण्यासारखे असल्याचा इशाराही त्यांनी दिला. आ. ओगले यांनी सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल तसेच जिल्हाधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक व अपर पोलिस अधीक्षक यांनाही पत्राच्या प्रती पाठवून तातडीने कारवाईची मागणी केली आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोपींची पोलिस कोठडी रविवारपर्यंत असून, चौकशीत अनेक बड्या नावांचा उलगडा होण्याची शक्यता आहे. गुन्ह्यात वापरलेली यंत्रणा पुरविणारे पुण्यातील दोन संशयित अद्याप पोलिसांच्या ताब्यात आलेले नसून, त्यांच्या चौकशीनंतर या रॅकेटचे आणखी धागेदोरे समोर येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## कोपरगाव बस डेपोतील व्यापारी गाळ्यांवर मूळ रहिवाश्यांचा हक्क

### उच्च न्यायालयाचे परिवहन विभागाला निर्देश; ४८ विस्थापित कुटुंबांना दिलासा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : कोपरगाव बस डेपो परिसरातील नियोजित व्यापारी संकुलातील गाळे मूळ विस्थापित दलित रहिवाशांना वितरित करण्याबाबत उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने परिवहन विभागाला स्पष्ट निर्देश दिले आहेत. या आदेशामुळे अनेक वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या ४८ कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. कोपरगाव शहरातील सी.टी.एस. क्र. १८०९ या जागेवर दलित समाजातील ४८ कुटुंबांची घरे होती. सन १९५८ नंतर या जागेवर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे बसस्थानक, वर्कशॉप तसेच पेट्रोल पंप उभारण्यात आला. त्यावेळी तत्कालीन जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी २७ मे १९५९ रोजी बसस्थानकाच्या शेजारी ३५ बाय २५ आकाराचे ४८ प्लॉट विस्थापित कुटुंबांना देण्याचे आदेश दिले होते.

मात्र, अनेक दशकांनंतरही संबंधित कुटुंबांना ना प्लॉट मिळाले, ना पर्यायी जागा उपलब्ध झाली. त्यामुळे प्रकाश सुखदेव दुशिंग, बाबासाहेब भास्कर कोपरे व इतरांनी कोपरगाव बसस्थानकातील नियोजित व्यापारी संकुलातील गाळे मूळ रहिवाशांना देण्यात यावेत, अशी मागणी करत २३ फेब्रुवारी २०२४ रोजी आगारप्रमुख, महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळ यांच्याकडे निवेदन सादर केले होते. परिवहन विभागाकडून निर्णय न झाल्याने ड. शिवराज कडू यांच्यामार्फत उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक ६७२४/२०२५ दाखल करण्यात आली. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने १७ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या आदेशात याचिकाकर्त्यांना सुनावणीची संधी देऊन आठ आठवड्यांच्या आत नियोजित व्यापारी गाळे मूळ विस्थापितांना वितरित करण्याबाबत निर्णय घ्यावा, असे निर्देश दिले.

या आदेशामुळे दलित समाजातील विस्थापित कुटुंबांना न्यायाची नवी आशा निर्माण झाली असून, कोपरगाव शहरात या निर्णयाकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले जात आहे. स्थानिक नागरिकांमध्येही या निर्णयाचे स्वागत होत आहे.

## माजी सैनिक कुटुंबीयांना फसवून मालमत्ता हडपल्याची तक्रार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : बनावट कागदपत्रे तयार करून फसवणूक करत मालमत्ता हडपण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. बेलापूर खुर्द येथील अभिजित पंढरीनाथ शिंदे यांनी याबाबत तक्रार अर्ज देत संबंधितांवर कारवाईची मागणी केली आहे. तक्रारीनुसार, बेलापूर खुर्द येथील गट क्रमांक ४४/२/३/१ मधील मिळकतीवर तक्रारदाराचा वारसाहक्क असल्याचे सांगण्यात आले आहे. संबंधित मिळकतीवर तक्रारदार व त्यांच्या कुटुंबीयांचा वास्तव्यासह ताबा असल्याचा दावा करण्यात आला आहे.

मात्र १७ एप्रिल २०२६ रोजी काही व्यक्तींनी फसवणूक करून खरेदी-विक्री कार्यालयात नेऊन कागदपत्रांवर सही घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. यानंतर संबंधित मिळकत परस्पर विक्री केल्याचे समोर आले. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, या व्यवहारासाठी कोणतीही रक्कम देण्यात आलेली नसून बनावट दस्तऐवजांच्या आधारे व्यवहार करण्यात आला आहे. यामुळे आपल्या मालमत्तेवर बेकायदेशीर ताबा मिळवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणी प्रियंका प्रशांत गोरडे, नानासाहेब रखमाजी गाढे व तुकाराम हौशीराम बनकर यांच्याविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. तसेच महसूल विभागाकडूनही संबंधित प्रकरणी सुनावणी ठेवण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे.

### यापूर्वीही फसवणूक

फसवणूक करणारा संबंधित व्यक्ती सरकारी कार्यालयात एजंटगिरीचे काम करतो. सरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना रेकॉर्डिंग करण्याची धमकी देत त्याच्या पद्धतीने कामे करण्यास भाग पाडतो. बेलापूर येथील प्रकरणाप्रमाणेच यापूर्वीही काही माजी सैनिकाच्या मालमत्ता हडपण्याचा त्याने प्रयत्न केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार करणे व मालमत्ता बळकावण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी कठोर कारवाई करावी अन्यथा आम्ही तीव्र आंदोलन छेडू.


**मेजर कृष्णा सरदार, माजी सैनिक संघर्ष समिती**

## रक्षक दलाच्या सतर्कतेमुळे एटीएम चोरीचा प्रयत्न उधळला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर नगरपरिषदेच्या रक्षक दलाने पुन्हा एकदा आपली सतर्कता सिद्ध करत मध्यरात्री घडलेला एटीएम तोडफोडीचा प्रकार उघडकीस आणला. आमदार सत्यजीत तांबे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या आणि नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या रक्षक दलाच्या तातडीच्या हालचालीमुळे संभाव्य चोरीचा प्रयत्न हाणून पाडण्यात यश आले. दि. ९ मे रोजी रात्री सुमारे १ वाजण्याच्या सुमारास रक्षक दलाची गाडी शहरात नियमित गस्त घालत होती.

त्यावेळी नगरपालिका गेटसमोरील सेंट्रल बँक ऑफ इंडिया एटीएममध्ये एक संशयित व्यक्ती असल्याचा कॉल रक्षक दलाला प्राप्त झाला. तसेच एटीएममधील लाईट बंद असल्याने संशय अधिक बळावला. यानंतर रक्षक दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. रक्षक दल घटनास्थळी पोहोचले असता संबंधित व्यक्ती तेथे आढळून आली नाही. मात्र एटीएमची पाहणी केली असता मशीनच्या डिस्प्लेची तोडफोड झालेली दिसून आली. एटीएमचे काही भाग तुटून खाली पडलेले होते. त्यामुळे प्रकार गंभीर असल्याचे लक्षात येताच परिसराची सखोल




पाहणी करण्यात आली. याचवेळी एटीएमपासून काही अंतरावर सुमारे २० वर्षांचा युवक बसलेला दिसून आला.

संशयाच्या आधारे त्याची चौकशी करण्यात आली. मात्र मी आत्ताच येथे आलो असून मला काहीच माहिती नाही, असे त्याने सांगितले. खबरदारीचा उपाय म्हणून रक्षक दलाने त्याला तेथेच थांबवत तातडीने संगमनेर पोलिसांशी संपर्क साधला. रक्षक दलाने अतिरिक्त पोलीस निरीक्षक विजय माळी यांना घटनेची माहिती दिल्यानंतर त्यांनी त्वरित घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करत सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या संगमनेर शाखा व्यवस्थापनाशी संपर्क साधला. त्यानंतर बँकेच्या कर्मचारी शांता धाडगे घटनास्थळी दाखल झाल्या व एटीएमची पाहणी केली. याबाबत पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. अवघ्या काही दिवसांपूर्वी स्थापन झालेले संगमनेर नगरपरिषदेचे रक्षक दल शहरात नियमित गस्त घालत असून विविध घटनांमध्ये तत्परतेने कारवाई करत आहे.

त्यामुळे नागरिकांमध्ये या दलाबद्दल विश्वास वाढत असून शहरात सुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे.


### नागरिकांच्या सुरक्षेसाठी रक्षक दल सक्रिय

लोकनेते बाळासाहेब थोरात व डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर सेवा समितीच्या माध्यमातून शहरात विविध विकासकामांना गती मिळाली आहे. आमदार सत्यजीत तांबे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेले रक्षक दल शहरातील संशयास्पद हालचाली, महिलांच्या सुरक्षेचे प्रश्न, चोरीचे प्रकार तसेच रात्रीच्या गस्तीसाठी सक्रियपणे काम करत आहे.

### पोलिसांनाही मोठी मदत

शहरात रक्षक दल कार्यरत झाल्यानंतर पोलिसांवरील ताण काही प्रमाणात कमी झाल्याची चर्चा आहे. अनेक घटनांमध्ये रक्षक दल प्रथम घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणत असल्याने पोलिसांना तपास आणि पुढील कारवाईसाठी मोठी मदत होत आहे. विशेषतः रात्रीच्या गस्तीमध्ये रक्षक दल महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

## सारसनगरच्या विधाते विद्यालयाचा ९२ टक्के निकाल



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : सारसनगर येथील कै. दामोदर विधाते मास्तर माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. शाळेचा निकाल ९२ टक्के लागला आहे. ६ विद्यार्थी विशेष प्राविण्यसह व १६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत श्रेणीत उत्तीर्ण झाले. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये संतोष गणेश नाणेकर ८३% मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. अजित विजय इंगवले ८२.४०% मिळवत द्वितीय, तर सिद्धार्थ राजेंद्र घुले ८९.२०% मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. रोशनी अरुण गोपाळघरे ७८% चौथा क्रमांक प्राप्त केला. या यशाबद्दल संस्थेचे विश्वस्त बाळासाहेब (अण्णा) विधाते, रामदासजी कानडे संस्था सरचिटणीस प्राध्यापक शिवाजीराव विधाते सर माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष सुसे, प्राथ विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजीराव म्हस्के सर व सर्व शिक्षक वृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. दहावीच्या विद्यार्थ्यांना सारिका गायकवाड, अमोल मेहेत्रे, सचिन बर्डे या शिक्षकांनी मोलाचे मार्गदर्शन केले.